रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १०३
www.ramprahar.com
◆ शुक्रवार, ३१ ऑक्टोबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

श्रीवर्धन जेट्टीच्या कामामुळे पाण्याची पातळी वाढली/२
पनवेल महापालिका करणार पाण्याचा पुनर्वापर/६
प्रतिक दर्णेची शरीरसौष्ठव स्पर्धांसाठी निवड/८

## सीबीएसई दहावी, बारावी परीक्षेच्या तारखा जाहीर



**नवी दिल्ली** : महाराष्ट्र स्टेट बोर्डाच्या दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेच्या तारखा जाहीर झाल्यानंतर आता सीबीएसई बोर्ड परीक्षेचेही वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. सीबीएसई दहावीची परीक्षा १७ फेब्रुवारी ते १० मार्च २०२६ या कालावधीत, तर बारावीची परीक्षा १७ फेब्रुवारी ते ९ एप्रिल २०२६ या कालावधीत होणार आहे. या वर्षी भारतासह २६ देशांतील सुमारे ४५ लाख विद्यार्थी सीबीएसई बोर्ड परीक्षेला बसणार आहेत. एकूण २०४ विषयांसाठी परीक्षा घेण्यात येणार असून प्रात्यक्षिक परीक्षा, मूल्यमापन आणि निकालाची जबाबदारीही सीबीएसई बोर्डाकडेच राहणार आहे. परीक्षा सुरू होण्याच्या तब्बल चार महिन्यांपूर्वीच वेळापत्रक जाहीर झाल्याने विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पुरेसा कालावधी मिळणार आहे. विद्यार्थ्यांना विषयनिहाय तारखा cbse.gov.in वेबसाइटवर पाहता व डाउनलोड करता येतील.

# मुंबईत ओलीस नाट्याचा थरार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या पवई परिसरातील स्टुडिओत मुलांना ओलीस ठेवणाऱ्या रोहित आर्यचा पोलीस चकमकीत मृत्यू झाला आहे. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात रोहितचा मृत्यू झाला असून ओलीस ठेवलेली १७ मुले व इतर दोन जणांची सुखरूप सुटका करण्यात आली आहे.

पवईतील महावीर क्लासिक येथे आर.ए. स्टुडिओ असून रोहित आर्य या माथेफिरूने ऑडिशनसाठी मुलांना बोलावले होते. त्यानुसार गुरुवारी (दि. ३०) ऑडिशनसाठी गेलेल्या १७ मुलांना रोहितने ओलीस ठेवले. वेबसीरिजच्या ऑडिशनसाठी आलेली ही सर्व मुले १० ते १२ या वयोगटातील होती.

ऑडिशनसाठी गेलेली मुले जेवणाच्या ब्रेकसाठी बाहेर आली नव्हती. त्यामुळे पालकांना शंका आली. यादरम्यान रोहितने व्हिडीओ पाठवल्याने मुलांना ओलीस ठेवल्याचे पालकांना समजले आणि परिस्थिती तणावपूर्ण बनली. घटनेची माहिती मिळताच



### आरोपी मनोरुग्ण

रोहित आर्य हा मनोरुग्ण असल्याचे सांगितले जात आहे तसेच त्याने मुलांना डांबून ठेवले होते तेव्हा एक व्हिडीओ जारी केला होता. यात त्याने म्हटले की, मला या मुलांना काहीच करायचे नाही, मात्र मला काही लोकांशी बोलायचे, चर्चा करायची आहे, माझ्या प्रश्नांची उत्तरे मिळवायची आहेत. मला कोणी रोखण्याचा, इथे येण्याचा प्रयत्न केला, तर या मुलांबरोबर काही वाईट घडल्यास मी जबाबदार नसेन. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून रोहित मानसिक तणावात होता व ट्रीटमेंटसुद्धा घेत असल्याचे समजते.

### माथेफिरूचे कृत्य, पोलिसांकडून एन्काउंटर, मुलांची सुखरूप सुटका

मुंबई पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहचले. रोहितकडे एअरगन असल्याची माहिती सूत्रांनी दिली. मुलांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पोलिसांनी एक गोळी रोहितच्या दिशेने झाडली. ही गोळी रोहितच्या छातीत लागली आणि यातच त्याचा मृत्यू झाला.

याबाबत मुंबई पोलिसांनी सांगितले की, पवईतील आर.ए. स्टुडिओमध्ये अडकलेली सर्व मुले सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आली आहेत. पोलिसांनी स्टुडिओमध्ये बाथरूमच्या मार्गाने आत प्रवेश केला. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार ही मुले मागील दहा दिवसांपासून सुरू असलेल्या एका शूटिंग ऑडिशनसाठी बोलावण्यात आली होती. सुटका केलेल्यांमध्ये १७ मुले, एक महिला आणि एका ज्येष्ठ नागरिकाचा समावेश असून सर्वांना तपासणीसाठी सेव्हन हिल्स रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

दिनेश गोसावी नावाच्या एका प्रत्यक्षदर्शीने सांगितले की, स्थानिकांनी या घटनेची पोलिसांना माहिती दिल्यानंतर पवई आणि साकीनाका पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आरोपीला दरवाजा उघडण्यास सांगितले, मात्र आरोपीने त्याच्याकडे बंदूक व ज्वलनशील पदार्थ असून कोणीही आत येण्याचा, दरवाजा तोडण्याचा प्रयत्न केला, तर मी हा स्टुडिओ पेटवून देईन अशी धमकी दिली. त्यानंतर बराच वेळ पोलीस आरोपीला समजावून मुलांना बाहेर काढण्याचा प्रयत्न करत होते.

या घटनेत दोन जण जखमी झाल्याची माहिती आहे. पोलीस आणि अग्निशमन दलाच्या जवानांकडून करण्यात आलेल्या रेस्क्यू ऑपरेशनदरम्यान एक सिनिअर सिटीझन महिला आणि लहान मुलगी जखमी झाली आहे. जखमींना जवळच्या रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले आहे.

# उरणमधील मच्छीमारांना मोंथा चक्रीवादळाचा फटका

## नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार -आमदार महेश बालदी

**उरण : रामप्रहर वृत्त**

मोंथा चक्रीवादळाचा उरण तालुक्यातील मच्छीमारांनाही फटका बसला आहे. सुदैवाने बोटीवरील सर्व खलाशी सुखरूप परतले असले तरी मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर आमदार महेश बालदी यांनी करंजा बंदरावर कोळी बांधवांशी संवाद साधत या नैसर्गिक संकटात तुमच्या पाठिशी असल्याचे सांगत धीर दिला तसेच नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी राज्य शासनाकडे प्रयत्न करणार असल्याची ग्वाही दिली.



मोंथा चक्रीवादळामुळे उरण तालुक्यातील सात मच्छीमारी बोटींचा संपर्क तुटल्याने चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते, परंतु बुधवारी या सर्व बोटी व त्यावरील खलाशांशी संपर्क झाला असून सगळे सुखरूप असल्याची माहिती आमदार महेश बालदी यांनी दिली. ते पुढे म्हणाले की, चक्रीवादळामुळे खोल समुद्रातून वाट काढत काही बोटी परत आल्या. यात मच्छीमारांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. एक बोट समुद्रात मच्छीमारीसाठी गेल्यावर जर नैसर्गिक आपत्तीमुळे परत यावे लागले, तर दोन ते तीन लाख रुपयांचे नुकसान होते. या वेळीही मच्छीमार बांधवांना त्याच प्रकारच्या मोठ्या नुकसानीचा सामना करावा लागला आहे.

राज्य सरकारने नुकताच मच्छीमारांसाठी मोठा निर्णय घेत मत्स्यव्यवसायाला कृषी क्षेत्राचा दर्जा दिला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांप्रमाणेच मच्छीमारांनाही नैसर्गिक संकटात नुकसानभरपाई मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आता या धोरणामुळे कोळी बांधवांचे नुकसान भरून निघणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मत्स्यव्यवसायमंत्री नितेश राणे यांच्याकडे या संदर्भात झालेल्या नुकसानीचा अहवाल देऊन तत्काळ नुकसानभरपाई मिळावी, अशी ठोस मागणी करणार आहे. अस्मानी संकटाच्या काळात कोळी बांधवांना आधार देणारे सरकार राज्यात देवाभाऊंच्या नेतृत्वाखाली काम करीत आहे. आम्ही त्या अनुषंगाने शासनाकडे पाठपुरावा करू, असेही आमदार महेश बालदी यांनी सांगितले.

या वेळी मच्छीमार सोसायटीचे चेअरमन प्रदीप नाखवा, राजेश नाखवा, भारत नाखवा, रमेश नाखवा, जयविन कोळी, नारायण नाखवा, उमेश भगत, महेंद्र कोळी, ऋषिराज कोळी, राजेंद्र नाखवा आदी उपस्थित होते.

## निवडक

### चाबहार बंदरावरील निर्बंधांमधून भारताला सहा महिन्यांची सूट

**नवी दिल्ली** : अमेरिकेने भारताला त्यांच्या चाबहार बंदरासंदर्भातील निर्बंधातून सहा महिन्यांची सूट दिली असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली. हा निर्णय भारताच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानला जात आहे. चाबहार बंदरामुळे भारताला पाकिस्तानला वगळून अफगाणिस्तान आणि मध्य आशियाई देशांपर्यंत थेट व्यापार करण्याची सुविधा मिळते.

### पुणे जैन बोर्डिंग ट्रस्टचा व्यवहार अखेर रद्द

**पुणे** : शहरातील कोथरूड येथील जैन बोर्डिंग जमीन व्यवहार प्रकरणात जैन ट्रस्ट आणि गोखले बिल्डर यांच्यात झालेला जमीन व्यवहार अखेर रद्द करण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वी गोखले बिल्डर्सकडून हा जमीन व्यवहार रद्द करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले होते. त्यानुसार गोखले बिल्डर्सने माघार घेताच धर्मादाय आयुक्तांनी जमीन व्यवहार रद्द करण्याचे आदेश दिले आहेत.

## चालत्या कारवर दगड पडून महिलेचा मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

डोंगरातून एक मोठा दगड चालत्या कारवर पडून महिलेचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना गुरुवारी (दि. ३०) सकाळी साडेनऊच्या सुमारास ताम्हिणी घाटामध्ये घडली. माणगाव तालुक्यातील कोंडेथर गावच्या हद्दीत हा अपघात झाला.





स्नेहल गोविंदास गुजराती (वय, ४३, रा. पिंपरी चिंचवड, पुणे) असे या महिलेचे नाव असून ती आपल्या पती व सासूसह माणगाव तालुक्यातील गोरेगाव येथील नातेवाईकांच्या ओटी भरण्याच्या कार्यक्रमासाठी कारने (एमएच १४ एमएल ७४७९) निघाल्या होत्या. कार पती चालवत होता, तर ती पतीच्या बाजूच्या सीटवर बसली होती.

कार पुणे-माणगाव राज्य मार्गावरून येत असताना कोंडेथर गावाच्या हद्दीत अचानक डोंगरातून दगड आला आणि कारची सनरूफ फोडून तो महिलेच्या डोक्यावर आदळला. त्यामुळे स्नेहल गोविंदास गंभीर जखमी होऊन बेशुद्ध झाल्या. त्यांना माणगाव उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र तेथे डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

## गडकिल्ल्यांवर नमो पर्यटन माहिती सुविधा केंद्र होणार

**पुणे** : राज्याच्या पर्यटन विभागाच्या वतीने पर्यटकांसाठी चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी राज्यातील प्रतापगड, शिवनेरी, साल्हेर आणि रायगड या चार किल्ल्यांच्या ठिकाणी नमो पर्यटन माहिती सुविधा केंद्र सुरू करण्यात येणार आहे.

राज्यातील पर्यटन वाढावे, पर्यटकांनी जास्तीत जास्त किल्ल्यांना भेटी द्याव्यात, या किल्ल्यांचा जाज्वल्य इतिहास आणि त्याचे महत्त्व लक्षात यावे यासाठी नमो पर्यटन माहिती सुविधा केंद्र सुरू करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात या चार किल्ल्यांचा समावेश करण्यात आला आहे. ही केंद्र सुरू करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने ५० कोटींचा निधी देण्यात येणार आहे.

## रायगड जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनिषा विखे अखेर निलंबित

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनिषा विखे यांना अखेर निलंबित करण्यात आले आहे. कार्यपद्धतीबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीवरून त्यांची प्राथमिक चौकशी करण्यात आली. सादर करण्यात आलेल्या अहवालातील निरीक्षणांच्या आधारे त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई आली आहे.

राज्य शासनाचे कार्यासन अधिकारी प्रे.ज्ञा. सोनटक्के यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९नुसार तत्काळ निलंबनाचे आदेश पारित केले आहेत. पुढील आदेश मिळेपर्यंत डॉ. विखे निलंबित असणार आहेत. निलंबन आदेश अमलात असेपर्यंत डॉ. विखे यांचे मुख्यालय हे उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे येथे निश्चित करण्यात आले आहे. त्यांना सक्षम अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

### काय आहे प्रकरण?

डॉ. मनिषा विखे या रायगड जिल्हा परिषदेत जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. त्यांची ठाणे येथे जिल्हा क्षयरोग अधिकारी म्हणून बदली झाली. त्यांच्या जागी डॉ. दयानंद सुर्यवंशी यांची नियुक्ती करण्यात आली. या विरोधात त्यांनी 'मॅट'मध्ये धाव घेतली. डॉ. विखे यांना पुन्हा रायगड जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून रूजू करून घ्यावे असा निर्णय 'मॅट'ने दिला. दरम्यानच्या काळात डॉ. विखे यांच्याविरोधात आरोग्य कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी यांच्या तक्रारी होत्या. आरोग्य कर्मचारी तसेच अधिकाऱ्यांच्या संघटनांनीदेखील त्यांच्याविरोधात तक्रारी केल्या. त्यावर डॉ. विखे यांची खातेनिहाय चौकशी सुरू होती.

*एका निनावी पत्रावरून माझी चौकशी झाली, मात्र मला चौकशी अहवाल दिला नाही किंवा माझे म्हणणे मांडण्याची नियमानुसार संधीही देण्यात आली नाही. त्यामुळे हा निलंबन आदेश योग्य नाही. मी कोणताही गैरप्रकार वा गैरवर्तन केलेले नाही. त्यामुळे मी राज्याच्या आरोग्यमंत्री यांच्याकडे या निर्णयाविरुद्ध दाद मागणार आहे.*

**-डॉ. मनीषा विखे,** रायगड जिल्हा आरोग्य अधिकारी

## माथेरानमधील घोड्यांची निवारा शेड प्रशासनाने हटवली

### अश्वपाल संघटनांकडून पर्यायी जागेची मागणी



**नेरळ, माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानच्या दस्तुरी नाका परिसरात असलेली घोड्यांची निवारा शेड रायगड जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार गुरुवारी (दि. ३०) सकाळी मोठ्या पोलीस बंदोबस्तात नगर परिषदेकडून हटवण्यात आली. या कारवाईमुळे ४०० प्रवासी व मालवाहतूक घोडे बेघर झाले आहेत.

माथेरानमध्ये भूखंड क्र. ९३ हे सुमारे ५.५ एकर महसूल विभागाचे क्षेत्र असून येथे अश्वपालांनी घोड्यांसाठी तात्पुरते शेड बांधले होते. अश्वपाल संघटनेने या जागेतील एक एकर क्षेत्र घोड्यांच्या निवाऱ्यासाठी अधिकृतपणे देण्याची मागणी प्रशासनाकडे अनेकदा केली होती, पण जिल्हाधिकारी कार्यालयाकडून ही जागा वाढत्या पार्किंग आणि वाहतूक कोंडीच्या समस्येवर उपाय म्हणून घेण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, अश्वपाल संघटना आणि स्थानिक मूलनिवासी यांनी प्रशासनाकडे तातडीने पर्यायी जागेची मागणी केली असून तोपर्यंत माथेरानमधील पुरवठा खंडित ठेवू, असा इशाराही काही संघटनांनी दिला आहे.

*आमचे घोडे हे भूखंड क्र. ९३मध्ये प्लास्टिक शेड उभारून त्यात बांधत आहोत. या भूखंडातील एक एकर जागा आमच्या घोड्यांच्या तबेल्यासाठी द्या अशी मागणी वारंवार प्रशासनस्तरावर करूनदेखील आमच्या मागणीकडे दुर्लक्ष केले गेले आहे, मात्र दोन नोटीस बजावत आमच्यावर धडक कारवाई करून आमच्या घोड्यांचा निवारा हिरावण्याचे काम माथेरान गिरीस्थान नगर परिषद प्रशासनाच्या माध्यमातून केले गेले आहे. तरीही भूखंडामध्ये जागा मिळण्याच्या आमच्या मागणीवर आम्ही ठाम आहोत.*

***-राकेश चव्हाण,***
*मालवाहतूक घोडेमालक*

*माथेरानमधील भूखंड क्र. ९३ हा प्लॉट वाहन पार्किंग आणि लॉजिस्टिक्ससाठी राखीव ठेवला आहे. माथेरान येथे वाहतूक कोंडीच्या वारंवार तक्रारी येत होत्या, शिवाय जिल्हाधिकाऱ्यांनीही याबाबत कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार आम्ही कारवाई केली असून येथील अनधिकृत घोडे तबेले हटवले आहेत. मालवाहतूक घोडेचालक संघटनांकडून जागेच्या मागणीसंदर्भात लेखी निवेदन मागितले आहे. त्यांचा प्रस्ताव घेऊन संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून ही बाबदेखील निकाली काढणार आहोत.*

***-राहुल इंगळे,***
*मुख्याधिकारी, माथेरान नगर परिषद*



# शालेय पोषण आहार कामगारांच्या मागण्यांबाबत सकारात्मक -मंत्री भुसे



**मुंबई : रामप्रहर वृत्त**

शालेय पोषण आहार कामगारांच्या प्रलंबित मागण्यांबाबत शालेय शिक्षण विभाग सकारात्मक असून त्यांच्या मानधनामध्ये वाढ व्हावी यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येईल, असे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले.

शालेय पोषण आहार कामगारांच्या प्रलंबित मागण्यांसाठी कामगारांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक घेण्यात आली. शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, उपसचिव तुषार महाजन, संचालक (प्राथमिक) शरद गोसावी, शालेय पोषण आहार कामगार संघटना फेडरेशन (सिटू) तसेच शिवशक्ती शालेय पोषण आहार स्वयंपाकी मदतनीस व ठेकेदार संघटनेच्या शिष्टमंडळातील पदाधिकारी आणि प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

शालेय शिक्षण मंत्री श्री.भुसे म्हणाले, शालेय पोषण कामगारांच्या मानधनामध्ये केंद्र आणि राज्य सरकारचा हिस्सा आहे. केंद्राच्या हिशामध्ये वाढ करण्याबाबत ९ एप्रिल २०२५ च्या पत्रान्वये केंद्र सरकारकडे विनंती करण्यात आली आहे, त्याचा पाठपुरावा करण्यात येईल. शालेय पोषण कामगारांबाबत यापूर्वी राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याला प्राधान्य देण्यात येईल. त्याचबरोबर इतर राज्यांनी घेतलेल्या निर्णयांचा अभ्यास करुन किमान वेतन कायद्याबाबत देखील मार्गदर्शन घेण्यात येईल.

शालेय पोषण आहार कामगारांना सध्या २,५०० रुपये महिना मानधन दिले जाते. या कामगारांना ५ जुलै २०२४ च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयाप्रमाणे मानधनात एक हजार रुपयांची वाढ लागू करावी, कामगारांच्या कामाच्या तासाची नोंद ठेवून त्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन द्यावे, कामगारांना १० महिने ऐवजी १२ महिने मानधन द्यावे, दिवाळी भाऊबीज म्हणून दोन हजार रुपये द्यावेत, निवृत्ती वेतन लागू करावे, गणवेश द्यावा, काम करताना दुखापत झाल्यास मेडिकल क्लेम व मृत्यू झाल्यास वारसाला पाच लाख रुपये द्यावेत आदी मागण्या यावेळी मांडण्यात आल्या. या मागण्यांपैकी रास्त मागण्यांबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल, असे मंत्री दादाजी भुसे यांनी यावेळी सांगितले.

# इंडिया मेरिटाईम वीकमध्ये नमुंमपाच्या स्टॉलला पसंती

## वस्त्र पुनर्प्रक्रिया सुविधा केंद्राच्या प्रकल्पाला नागरिकांची पसंती



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नौवहन क्षेत्र विकासाच्या दृष्टीने महत्वाचा असलेली 'इंडिया मेरीटाईम विक २०२५' ही अभिनव परिषद मुंबई येथे सुरू असून मा.पंतप्रधान महोदयांनी त्याठिकाणी विशेष उपस्थिती दर्शवित तसेच मा.केंद्रीय गृहमंत्री महोदयांनी या उपक्रमाचे उद्घाटन करीत आधुनिक जगातील त्याचे महत्व अधोरेखित केले आहे.

अशा महत्वाच्या ठिकाणी केंद्र सरकारच्या वस्त्र मंत्रालयांतर्गत वस्त्र समिती आणि नवी मुंबई महानगरपालिका यांच्या संयुक्त सहयोगाने कार्यान्वित वस्त्र पुनर्प्रक्रिया प्रकल्पाविषयी (टीआरएफ) माहिती देणारा स्टॉल या प्रदर्शनात उभारण्यात आलेला आहे. वस्त्र कच-यावर ठोस उपाययोजना करणारा हा देशातील पहिला प्रकल्प असून हा प्रायोगिक स्वरूपातील पायलट प्रोजेक्ट पोस्ट कंझ्युमर टेक्सटाईल मॅनेजिंग बाय टेक्सटाईल व्हॅल्यू चेन बाय मॅनेजिंग पोस्ट कंझ्युमर टेक्सटाईल अल्पावधीतच नवी मुंबईकर नागरिकांप्रमाणेच देशभराचे लक्ष वेधणारा ठरला आहे.

याव्दारे कच-यात टाकल्या जाणा-या कापडी कच-यावर पुनर्प्रक्रिया करून तो पुन्हा वापरात आणला जात असून याव्दारे पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनाचे मोठे काम होत आहे. सीबीडी बेलापूर नवी मुंबई येथे कार्यान्वित वस्त्र पुनर्प्रक्रिया सुविधा केंद्रातील समुहाने वस्त्र कच-याचे संकलन, वर्गीकरण आणि पुनर्वापर याद्वारे वस्त्र कचरा हा महानगरपालिकेच्या घनकचरा प्रक्रिया प्रकल्पस्थळी न नेता त्याचा पुनर्वापर करण्याकडे लक्ष केंद्रित केले आहे. महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या केंद्राला मिळत असलेल्या नागरिकांच्या उत्साही सहकार्यामुळे हा उपक्रम अल्पावधीतच यशस्वी झाला असून त्यामधील वैशिष्ट्यपूर्ण गोष्टींचे प्रदर्शन या परिषदेठिकाणी मांडलेल्या स्टॉलमधील विविध बाबींमधून करण्यात आले असल्याची माहिती उपआयुक्त स्मिता काळे यांनी दिली.

त्याचप्रमाणे ही परिषद सागरी जीवनाशी संबंधित बाबींवर असल्याने या प्रदर्शनात मांडलेल्या स्टॉलद्वारे जैवविविधता आणि जलचर जीवनावर कापडी कचऱ्याचा कसा परिणाम होतो याची माहिती देण्यावर भर देण्यात आलेला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून गृहनिर्माण संस्थांमधून गोळा केलेल्या पोस्ट कंझ्युमर टेक्सटाईल कचऱ्यापासून टीआरएफमधील महिला कारागिरांनी तयार केलेल्या शाश्वत उत्पादनांचाही समावेश या प्रदर्शनात करण्यात आलेला आहे. सदर टीआरएफ प्रकल्प केंद्र सरकारचे वस्त्र मंत्रालय, वस्त्र समिती, नवी मुंबई महानगरपालिका यांच्यासह एसबीआय फाउंडेशन आणि टिसर आर्टिसन ट्रस्ट यांच्या सहकार्याने कार्यान्वित असून या आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदेतील सहभागामुळे या प्रकल्पाची वैशिष्ट्ये जगभरातील नागरिकांपर्यंत पोहचत आहेत.

# महाड येथे रेखाचित्र शाखा कर्मचारी संघटनेचा २ नोव्हेंबरला सुवर्ण महोत्सव

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य रेखाचित्र शाखा कर्मचारी संघटनेचा सुवर्ण महोत्सवी सोहळा रविवार दिनांक २ नोव्हेंबर रोजी महाड, जिल्हा रायगड येथे श्री. विश्वास काटकर, सरचिटणीस राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र त्यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले, एच.डी. दशपुते, सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग, डॉ. संजय बेलसरे, सचिव जलसंपदा विभाग व लाभक्षेत्र विकास हे उपस्थित राहणार आहेत.

हा कार्यक्रम भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक महाड येथे सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. यावेळी महाराष्ट्र राज्य रेखाचित्र शाखा कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष जकी अहेमद जाफरी, उपाध्यक्ष रवींद्र बिंड व राहुल साळुंखे, सरचिटणीस सुधीर गभणे, अतिरिक्त सरचिटणीस विनायक जोशी, कोषाध्यक्ष सौ. वंदना परिहार, सहकोषाध्यक्ष अमोल सुपेकर उपस्थित राहणार असल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष जकी अहेमद जाफरी यांनी दिली आहे.

या कार्यक्रमासाठी संघटनेच्या सर्व सभासदांनी उपस्थित राहावे असे आवाहन स्वागताध्यक्ष नरेंद्र महाडिक यांनी केली आहे. या कार्यक्रमासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून मिळून अंदाजे ७०० सभासद उपस्थित राहण्याची शक्यता आहे, अशी माहिती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली आहे.

# श्रीवर्धन समुद्रकिनारी जेट्टीच्या कामामुळे पाण्याची पातळी वाढली

**श्रीवर्धन : बातमीदार**



श्रीवर्धन मधील जीवनाबंदर या ठिकाणी नवीन जेट्टीचे काम सुरू आहे. या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणात भराव करून जेट्टी बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे. त्याचप्रमाणे श्रीवर्धन दांडे परिसरात देखील नवीन जेट्टी विकसित करण्यात येत आहे. या जेट्टी कडे जाणाऱ्या मार्गासाठी दगडांचा मोठ्या प्रमाणात भराव करून खाडीचे तोंडच जवळजवळ बंद झाल्याने, श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरील पाण्याची पातळी सातत्याने वाढत आहे. पाण्याची पातळी वाढल्यामुळे श्रीवर्धन समुद्रकिनारी ओहोटीच्या वेळेस सुद्धा पाणी मागे जात नसल्याने येणाऱ्या पर्यटकांमधून प्रचंड नाराजी व्यक्त केली जात आहे. शासनाने विकास कामे जरूर करावीत, परंतु विकास कामे करत असताना त्यांचा योग्य अभ्यास होणे देखील गरजेचे आहे. विकास कामे करताना जर का श्रीवर्धन किनारपट्टीवरील पर्यटनच नष्ट होणार असेल तर श्रीवर्धन येथील पर्यटकांचा ओघ कमी झाल्याशिवाय राहणार नाही. अशी शंका नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.

खाडीच्या तोंडाजवळच जेट्टीचे बांधकाम सुरू असून या ठिकाणी जेट्टीवर जाण्यासाठी तयार करण्यात आलेल्या मार्गावर सुद्धा दगडांचा भराव करण्यात आल्यामुळे खाडीत येणारे समुद्राचे पाणी अडले जात आहे. सध्या असलेले खाडीचे तोंड देखील उथळ झाल्यामुळे भरतीचे पाणी खाडीमध्ये जात नसल्याने, त्याचे गंभीर परिणाम श्रीवर्धनच्या पर्यटनावर होण्याचे बोलले जात आहे.खाडीच्या तोंडाजवळ असलेली वाळु उपसा करुन पाणी खाडीमध्ये जाण्यासाठी मार्ग मोकळा करुन देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. जीवना बंदर येथील जेटीच्या बांधकामा नंतर देखील श्रीवर्धन येथील असलेली जुनी जेट्टी पूर्णपणे वाळूने भरून गेलेली आहे.

त्याचप्रमाणे खालचा जीवना परिसर देखील वाळूने भरून गेला आहे. सदर जेट्टीचे काम सुरू करण्या अगोदर याबाबत योग्य तो तज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक असताना असा कोणत्याही प्रकारचा सल्ला घेतलेला दिसत नसल्यानेच श्रीवर्धन समुद्र किनाऱ्याची अवस्था बिकट होत चालली आहे. श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर उतरण्यासाठी असलेल्या पायऱ्या व रॅम्प पूर्णपणे तुटून गेल्याने पर्यटकांना समुद्र किनारी वाळूमध्ये खेळणे देखील शक्य नाही. तरी शासनाने या कामाबाबत योग्य ती पाहणी करून योग्य निर्णय घ्यावे.

जेणेकरून श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर ओहोटीच्या वेळी पाणी मागे जाईल. ओहोटीच्या वेळी पाणी मागे जात नसल्याने या ठिकाणचे सर्व वॉटर स्पोर्ट्स त्याचप्रमाणे इतर व्यावसायिकांना मोठा फटका बसत आहे. तरी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत योग्य ती पाहणी करून तज्ञ अभियंतांचा सल्ला घ्यावा व श्रीवर्धन किनाऱ्याची बिकट झालेली अवस्था पूर्वपदावर आणावी. अशी मागणी स्थानिक नागरिकांमधून केली जात आहे.

# खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णवाहिकाच आजारी, प्रशासनाने उपचारासाठी लक्ष देण्याची गरज

**खोपोली : प्रतिनिधी**



गर्भवती आदिवासी महिलेची रुग्णवाहिके अभावी झालेली हेळसांडची दखल दहा दिवस उलटून गेले तरी आरोग्य विभागाने घेतली नसून १०२ क्रमांकाची रुग्णवाहिका अद्यापही बंद अवस्थेत आरोग्य केंद्राच्या आवारात उभी आहे. १९ ऑक्टोंबर रोजी आठ महिन्याची गर्भवती महिलेला अधिक उपचारासाठी खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रातून अलिबाग जिल्हा रुग्णालयात नेण्यासाठी दोन तास ताटकळत बसण्याची वेळ आली होती. खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी देण्यात आलेली १०२ क्रमांकाची रुग्णवाहिकेमध्ये बिघाड आहे. तसेच बॅटरी देखील चार्ज नसल्याचे रुग्णवाहिका बंद आहे. या घटनेनंतर सामाजिक कार्यकर्ते तसेच संस्था यांनी संताप व्यक्त करून देखील आरोग्य विभाग निद्रिस्त अवस्थेत आहे. अद्यापही १०२ क्रमांकाची रुग्णवाहिका दुरुस्तीसाठी पाठवण्यात आलेली नाही . प्रशासनाकडून होत असलेली दिरंगाई यामुळे संताप व्यक्त होत आहे.

तालुक्याच्या ठिकाणी असलेले खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्र गरीब गरजू ग्रामस्थांसाठी मोठा आधार आहे. या ठिकाणी बाह्य रुग्ण कक्षात उपचारासाठी दररोज शंभर पेक्षा अधिक रुग्ण येतात. तर प्रसूती साठी तज्ञ डॉक्टर असल्याने वाडी वस्तीवरील कुटुंबांना आधार आहे. एखादे वेळी गंभीर परिस्थिती उद्भवल्यास रुग्णाला तातडीने हलवण्यासाठी आरोग्य केंद्राची हक्काची १०२ क्रमांकाची रुग्णवाहिका त्यासाठी गरजेची असून रुग्णवाहिकाच आजारी असल्याने त्यावर प्रशासन उपचार करण्याची गरज आहे.

**१०२ क्रमांकाची रुग्णवाहिका दुरुस्ती करण्यात यावी यासाठी वरिष्ठना माहिती दिली आहे. खालापूर आरोग्य केंद्रासाठी रुग्णवाहिका अत्यंत गरजेची आहे.**

**-डॉ. अनिलकुमार शहा,**
**आरोग्य अधिकारी, खालापूर**
**प्राथमिक आरोग्य केंद्र**

# भाजप युवा नेते अजय इंगुलकर यांच्या अभिनंदनाचा ठराव



**खोपोली : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे खोपोली शहर अध्यक्षपदी युवा नेते अजय इंगुलकर यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली याबाबत खोपोली मंडळा तर्फे त्यांच्या अभिनंदनचा ठराव एकमुखाने संमत करण्यात आला.

शहर मध्यवर्ती कार्यालयात भाजप खोपोली निवडणूक यंत्रणा प्रमुख ज्येष्ठ नेते यशवंत साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी नगराध्यक्षपदासाठी इच्छुक उमेदवार विक्रम साबळे, कर्जत खालापूर समन्वयक हेमंत नांदे, खोपोली माजी शहराध्यक्ष इंदरशेठ खंडेलवाल, महिला अध्यक्ष अश्विनी अत्रे, कामगार आघाडीचे सूर्यकांत देशमुख, कामगार नेते रामभाऊ पवार, युवा कार्यकर्ते मीतेश शहा, हिम्मतराव मोरे, दिलीप पवार, सुनील नांदे इत्यादीसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त सिडको भवनमध्ये व्याख्यान

**सिडको :**



सिडकोचे मुख्यालय असलेल्या सिडको भवन येथे दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त गुरुवार, दि. ३० ऑक्टोबर २०२५ रोजी के. के. वरखेडकर, माजी मुख्य अभियंता, सिडको यांचे कॉन्ट्रॅक्ट ड्राफ्टिंग : सिलेक्शन ऑफ इक्विटेबल कंडिशन्स ण्ड इनकॉर्पोरेशन ऑफ सीव्हीसी गाईडलाईन्स टू एन्श्युअर फेअरनेस विथ ट्रान्सपरन्सी तर कायदेतज्ज्ञ सुशील गुप्ता यांचे डिस्प्युट रेझोल्युशन बाय वे ऑफ रिकन्साइलेशन अँण्ड आरब्रिट्रेशनविथ ट्रान्सपरन्सी या विषयांवर व्याख्यान पार पडले.

या प्रसंगी श्रीमती शीला करुणाकरन, मुख्य अभियंता(नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ), सिडको, दीपक हरताळकर, मुख्य अभियंता (नवी मुंबई) विनूनायर, व्यवस्थापक (कार्मिक), सिडको, सुभाष पाटील, अध्यक्ष सिडको एम्प्लॉईज युनियन यांसहसिडकोतील अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपल्या व्याख्यानमध्ये श्री. वरखेडकर यांनी बांधकाम क्षेत्रामध्ये असलेले करार मसुदा लेखनाचे महत्त्व विशदकरून कराराचा मसुदा सुस्पष्ट असल्यावर करार करणाऱ्या पक्षांमध्ये विश्वास निर्माण होऊन, अधिक वादनिर्माण न होता प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करणे शक्य होते, असे प्रतिपादन केले. श्री. गुप्ता यांनी वादांचेनिराकरण करण्याकरिता उपलब्ध असलेल्या सलोखा , न्यायालयीन लढाई , मध्यस्थी, समेट , वाटाघाटी आणि लोक अदालत या विविध मार्गांबद्दल सविस्तर माहिती दिली.

# अलिबाग-रोहा रस्त्यावरून शिवसेना आक्रमक

**अलिबाग : प्रतिनिधी**



अलिबाग ते रोहा रस्त्याच्या दुरूस्तीच्या कामाला तातडीने सुरूवात करावी, अशी मागणी शिवसेनेने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे करण्यात आली आहे.

शिवसेनेचे अलिबाग तालुकाप्रमुख अनंत गोंधळी यांच्या नेतृत्वाखालील ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने गुरुवारी (दि.३०) सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता एम.एम. धायतडक यांना निवेदन दिले.

या रस्त्याचे दुरुस्तीचे काम १० नोव्हेंबरपासून चालू करावे. न केल्यास हे काम आम्ही ग्रामस्थ स्वखर्चातून व आमच्या श्रमदानातून १२ नोव्हेंबरपासून चालू करू. पुढे काही झाल्यास त्यास पूर्णपणे आपले विभागीय कार्यालय जबाबदार राहील असे निवेदनात नमूद आहे.

**केलेल्या कामाचे ठेकेदाराला १०४ कोटी रुपये देण्यात आले आहेत. अजून १४ कोटी द्यायचे आहेत, पण निधी उपलब्ध नाही. त्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा सुरू आहे. निधी प्राप्त झाल्यावर उर्वरित काम करु अशी भूमिका ठेकेदाराने घेतली आहे. रस्त्याची दुरुस्ती करावी अशा सूचना देत आहोत.**

**-एम.एम. धायतडक,**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**

# नेरूळ-उरण लोकल १२ डब्यांची करावी, फेऱ्या वाढवाव्यात; प्रितम म्हात्रेंची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

नेरुळ-उरण लोकल १२ डब्यांची करावी तसेच फेऱ्या वाढवाव्यात अशी मागणी पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांनी रेल्वे प्रशासनाकडे केली आहे.रेल्वे प्रशासनाकडून सकारात्मक निर्णय लवकरच जाहीर होईल अशी खात्री त्यांनी यावेळी व्यक्त केली आहे

उरण परिसरातील प्रवाशांना दररोज भेडसावणाऱ्या गर्दीच्या आणि असुविधेच्या पार्श्वभूमीवर नेरुळ-उरण लोकल ट्रेन ९ डब्यांऐवजी १२ डब्यांची करण्यात यावी तसेच या मार्गावरील फेऱ्यांची संख्या वाढवावी, अशी मागणी करणारे स्मरणपत्र ३० ऑक्टोबर रोजी विभागीय रेल्वे व्यवस्थापक, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई यांना देण्यात आले. त्यानंतर सदर विषयात रेल्वे प्रशासनाच्या सकारात्मक बैठका झाल्या. मात्र अद्याप त्या संदर्भात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने ही मागणी पुन्हा करण्यात आली आहे. वाढत्या प्रवासीसंख्येमुळे सध्या धावणाऱ्या ९ डब्यांच्या लोकल अपुऱ्या पडत असून प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या आणि सोयीच्या दृष्टीने ही मागणी तातडीची असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

## दुखवटा

### नर्मदा भोईर



**नागोठणे :** पेण पंचायत समितीचे माजी सभापती संजय धाया भोईर यांच्या मातोश्री नर्मदा धाया भोईर यांचे मंगळवार दि. २८ ऑक्टोबर रोजी वयाच्या ७७ व्या वर्षी वृद्धपाकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पती,एक मुलगा, दोन मुली, सून, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांची दशक्रिया विधी गुरुवार दि. ६ नोव्हेंबर रोजी पाली उद्धर येथे व उत्तरकार्य रविवार दि. ९ नोव्हेंबर रोजी जांभूळटेप मानी ( नवीन वसाहत ) येथील त्यांच्या राहत्या घरी होणार आहे.

## निवडक

### मोहोपाड्यातून तरुण बेपत्ता

**मोहोपाडा :** येथील नितीन रघुनाथ पंडीत (वय ४०, रा. नविन पोसरी, मोहोपाडा, ता. खालापूर) हा घरातून जेवण पार्सल आणण्याकरीता गेला होता तो अध्यापही घरी परत आला नाही. त्याचे मोहोपाडा येथे सलूनचे दुकान असून दुकानातील कारागिर शहाबुद्दीन अन्सारी याच्याकडे जेवणाचे पार्सल देवून पाच मिनिटात येतो असे सांगून कुठेतरी निघून गेला आहे. त्याचे वर्णन सफेद रंगाचा शर्ट, काळी जिन्स पॅन्ट, उंची पाच फूट पाच इंच, केस काळे, दाडी बारीक वाढलेली, रंग गोरा, खोल पसरट डोळे, काळा चष्मा वापरतो. पायात बुट, अंगाने सडपातळ, उजव्या दंडावरती गणपतीचा टॅट्यू असे वर्णन असून त्याची पत्नी ज्योती पंडीत यांनी रसायनी पोलीस ठाण्यात मिसिंग तक्रार दाखल केली आहे. अधिक तपास करीत आहेत.



### मंगेश परूळेकर यांना पुरस्कार



**पनवेल :** सारस्वत चेंबर्सचा २०२४चा 'सारस्वत रत्न' पुरस्कार पनवेलमधील उद्योजक मंगेश परूळेकर यांना नुकताच देण्यात आला. गोव्याचे माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत व डेंन्पो यांच्या हस्ते हा पुरस्कार परुळेकर यांना प्रदान करण्यात आला. सिन्नपुरूष येथे झालेल्या कार्यक्रमात हा पुरस्कार देण्यात आला. पनवेलमधील ओरायन मॉल आणि एमपी बिल्डर्सचे मालक मंगेश परुळेकर हे सामाजिक क्षेत्रातील कामात नेहमी अग्रेसर असतात. या पुरस्काराबद्दल परूळेकर यांचे अभिनंदन केले जात आहे.

### राहत्या घरातून मोबाईलची चोरी

**पनवेल :** राहत्या घरातून अज्ञात चोरट्याने चार महागड्या मोबाईची चोरी केल्याची घटना नवीन पनवेल परिसरात घडली आहे. नवीन पनवेल सेक्टर १५ येथे राहणारे ऋषी खरात यांच्या घरातील ५५ हजार रुपये किमतीचे एकूण चार मोबाईल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### अनोळखी मृतदेह आढळला

**पनवेल :** परिसरात एक ५० वर्षीय अनोळखी मृतदेह आढळला असून पनवेल शहर पोलीस या मयताच्या नातेवाईकांचा शोध घेत आहे. मयत व्यक्तीच्या उजव्या हाताचे तळहातावर तसेच कोपराजवळ जखम झालेली असून डाव्या पायाला पांढऱ्या रंगाचा डाग आहे. या व्यक्तीबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक प्रियांका शिंदे यांच्याशी संपर्क साधावा.

# शाळा, महाविद्यालयात सायबर सुरक्षेबाबत जनजागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सायबर सुरक्षा सप्ताह अनुशंगाने खांदेश्वर पोलीस ठाणे मार्फत पोलीस ठाणे हद्दतील विविध शाळा, महाविद्यालय व धार्मिक सामाजिक कार्यक्रमात सायबर सुरक्षाबाबत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



या कार्यक्रमात उपस्थितांना शाळेतील विद्यार्थ्यांना सोशल मिडीया वापराबाबत तसेच ऑनलाईन गेमिंगबाबत होणाऱ्या फसवणुकीसंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. अनोळखी लिंक ओपन करू नका तसेच अनोळखी व्यक्तीस ओटीपी शेअर करू नका. डिजिटल अरेस्ट हा फसवणुकीचा प्रकार असल्याने घाबरून जाऊ नका, पोलीस ठाण्याशी संपर्क करा. शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक खात्रीशीर करा. अनोळखी व्यक्तीस आपली माहिती शेअर करू नका, दुप्पट पैसे, डिस्काउंट, पटकन लोन, यासारख्या लोभाला बळी पडू नका. सायबर फसवणुकीचे तात्काळ मदती करता १९३० / १९४५ डायल करा, पोलीस मदतीसाठी ११२ डायल करा.

या वेळी नवी मुंबई पोलीस व्हाट्सएप चॅनेल तसेच फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटर पेजची माहिती दिली. इत्यादी सुचना देण्यात आल्या.या कार्यक्रमादरम्यान विविध शाळा महाविद्यालय व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसादर देऊन सायबर सुरक्षाबाबत जागृत राहुन इतरांनाही जागृत राहण्याबाबत आव्हान करणार असल्याबाबत आश्वासन देण्यात आले आहे. तसेच पनवेल रेल्वे स्टेशन व 'डी' मार्ट नवीन पनवेल येथे पथनाटयद्वारे व खांदा कॉलनी परिसरात रोटरी क्लब मार्फत सायकल रॅली काढुन सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात आली.

## पोलिसांकडूनही पोस्टर, कॉर्नर बैठका

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

उरण तालुक्यातील पूर्व विभागातील सारडे व पिरकोन गावात उरण पोलिसांच्या वतीने नागरिकांत जनजागृती करण्यासाठी गावातील महत्वाच्या ठिकाणी पोस्टर लावून व कॉर्नर बैठका घेण्यात आल्या. या बैठकांमध्ये गावातील ग्रामस्थांना व महिलांसह तरुणाईला विविध प्रकारची प्रलोभने आणि गुन्ह्यांपासून सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले.


उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक हनिफ मुलाणी यांच्या आधिपत्त्याखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन खाडे यांचे पोलिस पथकाने घेतलेल्या महत्वपूर्ण बैठकांत महत्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे महत्त्व, दिवसा व रात्री घरफोडी, चैन स्नॅचिंग, बतावणी, सोने चांदी उजवून देतो विविध प्रकारचे स्ट्रीट क्राईम या प्रकारचे गुन्हे करणारे प्रकार,सायबर फ्रॉड, ऑनलाईन फ्रॉड, गेमिंग फ्रॉड, क्रिपटो करंसी फ्रॉड,सेक्सटोर्शन फ्रॉड व इन्व्हेमेंट फ्रॉड या प्रकारचे गुन्ह्यांचा समावेश आहे.



जास्त नफा मिळेल अशी प्रलोभाने दाखवून ठेवी स्विकारणारे व्हाईट कलर चिटर अशा गुन्ह्यांबाबत गावाच्या दर्शनी भागात वर्दळीच्या ठिकाणी रोडलगत व ग्रामपंचायत कार्यालयांच्या ठिकाणी वरील विषयांसंदर्भात योग्य अशा गुन्ह्यांच्या माहितीचे पोस्टर लावण्यात आले आहेत.

या कॉर्नर बैठका आणि पोस्टरच्या उपक्रमामुळे ग्रामीण परिसरातील ग्रामस्थांमध्ये कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडण्याची जनजागृती करण्यात आली. यामुळे वरील नमूद गुन्ह्यापासून नागरिकांना जागरूक करण्याचे उद्दिष्ट असल्याचे उरण पोलिसांनी म्हटले आहे.





**पनवेल :** दिवाळीनिमित्त पत्रकार सुनील पाटील यांनी वेध विकासाचा हा दिवाळी अंक प्रसिद्ध केला आहे. या अंकाचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. दरम्यान, त्यांनी पत्रकार पाटील यांना वाढदिवसाच्याही शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे युवा नेते राजेश काथारा उपस्थित होते.

## पनवेलमध्ये आयुष्मान भारत जनआरोग्य योजनेबाबत शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या सहकार्याने 'आयुष्मान भारत जनआरोग्य योजना' अंतर्गत नागरिकांना आरोग्यसेवेचा लाभ देण्यासाठी विशेष शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

हे शिबिर दिनांक ३० ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत घेण्यात येणार आहे. सकाळी ११.०० ते १.०० आणि दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत ३५६ समेळ निवास, मिरची गल्ली, नाक्याजवळ पनवेल येथे होईल.

योजनेचा लाभ घेण्यासाठी आधारकार्ड, रेशनकार्ड, कुटुंबातील सदस्यांचे आधारकार्ड तसेच आधारकार्डशी लिंक असलेला मोबाईल क्रमांक आवश्यक आहे. या शिबिराबाबत अधिक माहितीसाठी नागरिकांनी ८५९१८१६६११ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या उपक्रमाचे आयोजन माजी नगरसेविका तथा भाजप महिला मोर्चा शहराध्यक्ष रूचिता लोंढे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.

## दूषित पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल सेक्टर १७ पीएल ५ येथील १ ते २४ इमारतींमध्ये मागील काही दिवसांपासून दूषित पाण्याचा पुरवठा होत असून, त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

सिडको प्रशासनाला याबाबत कल्पना देऊनही त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप केला जात आहे. दूषित पाणीपुरवठा थांबला नाही, तर सिडकोवर मोर्चा काढत जाब विचारला जाईल, असा इशारा येथील रहिवाश्यांनी दिला आहे. नवीन पनवेल या भागामध्ये सतत दूषित मातीमिश्रित पाणीपुरवठा होत आहे. आधीच कमी दाबाने पाणीपुरवठा होत असताना त्यातही दूषित, गढूळ पाण्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत.

नवीन पनवेल परिसरात अनेक ठिकाणी लहान मुलं व वयोवृद्ध नागरिक आजारी पडत आहेत. लहान मुलांमध्ये कॉलरा, डायरिया याची साथ पाहायला मिळत आहे. दूषित पाणीपुरवठा त्वरित थांबवावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा येथील स्थानिक रहिवासींनी दिला आहे.

## हरवलेल्या वृद्ध महिलेला नातेवाईकांच्या केले सुपूर्द



**पनवेल :** तालुक्यातील कोप्रोली गावातील जिल्हा परिषद शाळे जवळ एक ८० वृद्ध महिला सापडली होती. पनवेल तालुका पोलिसांनी त्यांच्या नातेवाईकांचा शोध घेऊन त्यांना त्यांच्या ताब्यात देण्यात आले.

वंचाबाई केशव सानप (वय ८०) हे पनवेल तालुक्यातील कोप्रोली गावातील जिल्हा परिषद शाळे जवळ स्थानिकांना सापडल्या होत्या.

वृद्ध महिलेस पत्ता नीट सांगता येत नसल्याने स्थानिकांनी त्यांना पनवेल तालुका पोलिसांच्या ताब्यात दिले. पोलिसांनी सदर महिलेच्या मिसिंग दाखल आहे का याची चौकशी करत गुन्हे शाखेचे सपोनी गीजे यांच्या मदतीने नातेवाईकांचा शोध घेत त्यांना त्यांचे सून अलका सूर्यभान सानप यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# खारघरच्या 'मेडिकव्हर'मध्ये स्ट्रोक युनिटला शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जेव्हा मेंदूमध्ये एखादी नस ब्लॉक होते, तेव्हा ब्रेन स्ट्रोक येतो. ही एक जीवघेणी स्थिती आहे; ज्यावर वेळीच उपचार केला नाही, तर मृत्यूही होऊ शकतो योग्य वेळी उपचार केल्यास रक्तवाहिनीमधील अडथळा दूर केल्यास रुग्ण पूर्णपणे बरा होऊ शकतो, परंतु त्यासाठी मेंदूच्या पेशी मृत होण्याआधीच जलद उपचार मिळणे अत्यंत गरजेचे आहे. हे लक्षात घेऊन खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलने स्ट्रोक युनिटला सुरूवात केली आहे. यावेळी नवी मुंबईचे सहपोलीस आयुक्त संजय येनपुरे उपस्थित होते.




या युनिटमध्ये सीटी-एमआरआय चाचणी, थ्रोम्बोलिसिस, थ्रोम्बेक्टॉमी सारखी प्रगत तंत्रज्ञान, न्यूरो-आयसीयू आणि अनुभवी डॉक्टर, परिचारिकांची टीम यांचा समावेश आहे. नवी मुंबई, मुंबई, पनवेल आणि आसपासच्या शहरात राहणाऱ्या रुग्णांना या सुविधेचा नक्कीच फायदा होईल. मेंदूच्या एखाद्या भागात रक्त प्रवाहत अडथळा आल्यावर इस्केमिक स्ट्रोकतर मेंदूतील रक्तवाहिनी फुटली की हेमोरेजिक स्ट्रोक येतो. उच्च रक्तदाब, मधुमेह, कोलेस्ट्रॉल, धूम्रपान, लठ्ठपणा, हृदयरोग आणि बैठी जीवनशैली ही स्ट्रोकची प्रमुख कारणं आहेत.

नवी मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटलमधील न्यूरोलॉजिस्ट आणि न्यूरोसायन्ससचे संचालक डॉ. पवन ओझा सांगतात की, स्ट्रोकच्या सुरुवातीच्या लक्षणांमध्ये अचानक अशक्तपणा किंवा सुन्नपणा (बहुतेकदा शरीराच्या एका बाजूला), बोलण्यात किंवा समजण्यात अडचणी, दृष्टी समस्या, चक्कर येणे किंवा अचानक तीव्र डोकेदुखी यांचा समावेश होतो. सांकेतिक भाषेत स्ट्रोकच्या लक्षणांचे वर्गीकरण हे बीफास्ट असेही करता येते. याचा अर्थ (बॅलेन्स – संतुलन कमी होणे, आईज– दृष्टी धूसर होणे किंवा कमी होणे, फेस– चेहऱ्याचा काही भाग क्षीण होणे, आर्म– हात कमकुवत होणे, स्पीच– बोलण्यात अडचणी आणि टाईम– वेळ).

डॉ. ओझा पुढे सांगतात की, वेळीच उपचार केल्याने केवळ एखाद्याचा जीव वाचत नाहीत तर त्याच्या जीवनाची गुणवत्ता देखील सुधारता येते.

## गोशाळेत उमेश चौधरी यांच्या गाण्याचे संगीत माधुर्य

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

परिया येथील बेकल गोकुलम गोशाळा येथे 'परंपरा विद्यापीठा'च्या वतीने आयोजित पाचव्या दीपावली संगीत महोत्सवात रायगडचे सुपुत्र प्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडित उमेश चौधरी यांच्या सुमधुर गायनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

केरळ राज्याच्या उत्तर भागात, कासरगोड जिल्ह्यातील रमणीय अळक्कोडे या गावात, ऐतिहासिक बेकल किल्ल्याजवळ, ही गोकुलम गोशाळा व श्रीकृष्ण मंदिर वसलेले आहे. या पवित्र स्थळातून प्रेम, परंपरा आणि निसर्गाशी संतुलित सहजीवन यांचा दिव्य संदेश आजही प्रसारित होत आहे. गोकुलम गोशाळा ही सनातन धर्माच्या संस्कृतीचे सजीव प्रतीक मानली जाते. त्यामुळे आयोजित संगीत महोत्सव अधिकच मंगलमय आणि अध्यात्मिक ऊर्जे ने ओतप्रोत झाला. २० ऑक्टोबर ते १ नोव्हेंबरपर्यंत म्हणजेच तेरा दिवस चालणाऱ्या या महोत्सवाचे उद्घाटन उद्योगपती व भारतीय गोसंरक्षण चळवळीचे कार्यकर्ते महावीर सोनिका यांच्या हस्ते करण्यात आले.





या वेळी गोशाळेचे संस्थापक विशुप्रसाद हेब्बार, डॉ. नागरत्ना हेब्बार, संगीतगुरू वेल्लिकोट विशुभट्ट, तसेच प्रसिद्ध संगीतविद्वान थामरशैरी ईश्वरन भट्टथिरी उपस्थित होते. नेहमीप्रमाणे पं. उमेश चौधरी यांनी या महोत्सवातसुद्धा शास्त्रीय गायनाची किमया अधोरेखित करत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. या वेळी तबल्यावर गणेश भागवत तर हार्मोनियमवर सतीश हेग्गर यांची वाद्य साथ लाभली.

महोत्सवाच्या प्रारंभी उडुपीचे पावन आचार्य यांच्या नेतृत्वाखाली पंचवाद्य वीणेचा रंगतदार कार्यक्रम पार पडला. इडयार बंधू, उषा आणि जयलक्ष्मी भट्ट, टी. पी. श्रीनिवासन, श्रीहरी भट्ट, चैतन्य अशोक आणि वैष्णवी नांबियार यांनी मनमोहक सादरीकरण केले. महोत्सवाची सुरुवात आदित्य मोहन यांच्या कन्सर्टने झाली. त्यानंतर भरत कृष्ण, श्याम कृष्ण, अनीश व्ही. भट्ट, गिरीजा शंकर सुंदरशन आणि विभा राजीव यांनीही आकर्षक सादरीकरण केले. जयलक्ष्मी शेखर आणि निवेदिता अरुण यांच्या वीणा कन्सर्टने गोशाळेत संगीत सरिता वाहिली. प्रसिद्ध वीणावादक म्हैसूर आर.के. पद्मनाभ यांच्या सुरेल वादनाने प्रेक्षक भारावून गेले; त्यांना साई गिरिधर (मृदंग) आणि चंद्रशेखर शर्मा (घटम) यांनी अप्रतिम साथ दिली.

अनसूया पाठक, सर्वेश देवस्तळी, अभिज्ञा राव, शिल्पा पांज, स्नेहा गोमती, श्रीनिधी भट्ट, विभाश्री बैलारे, श्रुती वारिजाक्षन, श्रेया कोळत्ताय, प्रतिक्षा भट्ट आणि कांचना भगिनी यांच्या मैफिली तसेच गोशाळेचे संस्थापक विशुप्रसाद हेब्बार यांच्या रचनांचे प्रकाशन अजय मुक्कू यांच्या हस्ते झाले.

## पोलिसांमुळे एकाचा जीव वाचला!

**मोहोपाडा, चौक : प्रतिनिधी**

शांत रात्रीत अचानक गोंधळ उडाला, जेव्हा रसायनी पोलीस ठाण्यासमोरील एका रहिवासी संकुलात एक व्यक्ती चौथ्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या करण्याच्या तयारीत होता. तात्काळ दाखल झालेल्या पी.एस.आय. अनुसया डोणे आणि पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या धाडसी आणि संयमी मध्यस्थीमुळे अखेरीस त्या व्यक्तीचा जीव वाचला.

माहितीनुसार, पत्नीशी झालेल्या वादानंतर आणि मद्यप्राशनाच्या नशेत त्या व्यक्तीने आत्महत्येचा प्रयत्न केला होता. घटनास्थळी पोहोचलेले पोलीस निरीक्षक संजय बांगर यांनी शांतपणे संवाद साधत त्याचा राग शांत केला आणि त्याला मृत्यूचा निर्णय सोडण्यास प्रवृत्त केले. सुमारे तीन तास चाललेल्या या हाय-टेंशन ड्राम्यानंतर अखेर परिस्थिती नियंत्रणात आली.

एमआयडीसी पातळगंगा फायर ब्रिगेड आणि हेल्प फाउंडेशनच्या सदस्यांनीही पोलिसांसोबत समन्वय साधून सुरक्षित बचाव मोहिम राबवली. आपण पोलिस म्हणून नव्हे, तर माणूस म्हणून आज एका जीवाला वाचवलं – हेच खरं यश आहे, असे पोलीस निरीक्षक संजय बांगर यांनी सांगितले आहे.





**पनवेल : दिवाळी सणाचे औचित्य साधून साहित्याची आणि विचारांची मेजवानी देणारा शिवनेर दीपावली विशेषांक २०२५ हा दिवाळी अंक मुंबई मराठी पत्रकास संघाचे अध्यक्ष तथा 'शिवनेर'चे संपादक नरेंद्र वाबळे यांनी प्रसिद्ध केला आहे. या दिवाळी अंकाचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी झाले. या वेळी पत्रकार निलेश सोनावणे आणि दयानंद गांगुला उपस्थित होते.**

## पनवेलमध्ये मराठी एकीकरण समितीची बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका मुख्यालयामध्ये मराठी एकीकरण समितीचे पदाधिकारी आणि पनवेल महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांमध्ये बैठक घेण्यात आली. आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार झालेल्या बैठकीत मराठी भाषा समितीच्या विविध मागण्यांबाबत परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी चर्चा केली.



या बैठकित महापालिका क्षेत्रातील खाजगी दुकानांवरील नामफलक मराठी भाषेतूनच असावेत, विविध ठिकाणांचे शासकीय व खासगी सूचना फलक मराठीतूनच असावेत, विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये मराठीचा जास्तीत जास्त वापर, राष्ट्रगीतासोबतच राज्यगीताचा वापर अशा अनेक मागण्यांवर चर्चा करण्यात आली.

शासन निर्देशानुसार आयोजित करण्यात आलेल्या अभिजात मराठी भाषा संवर्धन सप्ताहातील प्रश्नमंजूषा, निबंध स्पर्धा, व्याख्यान, प्रदर्शन अशा विविध उपक्रमांची तपशीलवार माहिती मराठी एकीकरण समितीस देण्यात आली.

या वेळी सामान्य प्रशासन विभाग प्रमुख किर्ती महाजन, जनसंपर्क अधिकारी नितीन साके, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## संपादकीय

# नैसर्गिक आपदा मुळावर

लांबलेल्या पावसाने शेतकऱ्यांच्या डोळ्यांमध्ये पाणी आणले आहे. खरीप हंगामातील पिकांवर सततच्या पावसाने गंडांतर आल्याने बळीराजा हवालदिल झाला आहे. त्यानंतर आता मोंथा चक्रीवादळाचा फटका मच्छीमार, कोळी बांधवांना बसला आहे. त्याचबरोबर पर्यटन क्षेत्रावरही याचा विपरित परिणाम झाला असून त्यावर अवलंबून असलेल्या घटकांना नैसर्गिक आपत्तीची झळ बसत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

**सततचा पाऊस आणि आता आलेले 'मोंथा' चक्रीवादळ या दोन्ही नैसर्गिक आपत्तींचा परिणाम सध्या महाराष्ट्रातील शेतकरी आणि मच्छीमारवर्गावर मोठ्या प्रमाणात झाला आहे. एकीकडे शेतकऱ्यांची पिके, शेती आणि आर्थिक गणित उद्ध्वस्त झाले आहे, तर दुसरीकडे कोळी बांधवांचा मासेमारी व्यवसाय पूर्णतः ठप्प झाला आहे. राज्याचा ग्रामीण आणि किनारी भाग या दुहेरी संकटाचा सामना करीत आहे. ऑक्टोबर अखेरपर्यंत झालेली अतिवृष्टी व लांबलेल्या पावसाने शेतकऱ्यांचे जगणेच विस्कळीत झाले. खरीप हंगामातील सोयाबीन, तूर, मका, भात यासारखी पिके काढणीला आली असताना जोरदार पावसाने ती जमिनीतच कुजली. काही भागांत तर संपूर्ण शेतं पाण्याखाली गेली. शेतकऱ्यांनी खते, बियाणे, मजुरी यावर केलेला खर्च वाया गेला. सुदैवाने केंद्र व राज्य शासन शेतकऱ्यांचे हित पाहणारे असल्याने अवकाळीग्रस्त, पूरग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली जात आहे. पावसाचे संकट ओसरत नाही तोच मोंथा नावाच्या चक्रीवादळाने कोकण किनारपट्टीवर धोका निर्माण केला. हवामान खात्याच्या इशाऱ्यांनंतर महाराष्ट्र, गोवा आणि गुजरात किनाऱ्यावर मासेमारीस बंदी घालण्यात आली. परिणामी शेकडो नौका समुद्रकिनारी उभ्या राहिल्या. अनेक मच्छीमार कुटुंबांना रोजच्या रोज मिळणाऱ्या उत्पन्नावरच जगावे लागते. समुद्रात न जाता एक दिवससुद्धा त्यांनी थांबले की त्यांच्या संसाराची गाडी रेंगाळते. मच्छीमारांच्या हातास काम नाही, बाजारात मासळीचा पुरवठा कमी झाला आणि त्याचा थेट परिणाम स्थानिक अर्थव्यवस्थेवर दिसून येतो. कोकण किनारपट्टीवरील बंदरांमध्ये, मासळी बाजारांमध्ये आणि छोट्या खाद्यव्यवसायांमध्ये सध्या ओसाडपणा जाणवतो. मोंथा चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील किनारपट्टीवरील पर्यटनस्थळे तात्पुरती बंद ठेवण्यात आली आहेत. अनेक लोकप्रिय ठिकाणांवरील हॉटेल्स, रिसॉर्ट्स आणि होमस्टे बंद असल्याने स्थानिकांना मोठा फटका बसला आहे. पर्यटकांचा ओघ थांबल्याने खाद्यपदार्थ विक्रेते, चालक, बोट मालक, मार्गदर्शक, हॉटेल कर्मचारी अशा शेकडो लोकांचे रोजगार धोक्यात आले आहेत. कोकणच्या किनाऱ्यावर पर्यटन म्हणजे केवळ निसर्गसौंदर्य नाही, तर अनेक कुटुंबांचे पोट भरण्याचे साधन आहे. त्यावर चक्रीवादळाचे सावट पडल्याने हा भाग अडचणीत सापडला आहे. राज्य सरकारने नुकताच मत्स्यव्यवसायाला कृषी क्षेत्राचा दर्जा दिल्याने शेतकऱ्यांप्रमाणेच मच्छीमारांनाही नैसर्गिक संकटात नुकसानभरपाई मिळणार आहे, परंतु दरवर्षी महाराष्ट्रासह संपूर्ण देशाला अशा नैसर्गिक संकटांचा सामना करावा लागतो आहे. हवामान बदलाचा परिणाम आता स्पष्टपणे दिसून येतो. पावसाचे अनियमित चक्र, चक्रीवादळांची वारंवारता यामुळे शेती आणि मासेमारी दोन्ही क्षेत्रं अस्थिर बनत आहेत. निसर्गापुढे कुणाचे काही चालत नसले तरी दीर्घकालीन दृष्टीने हवामान अनुकूल शेती आणि टिकाऊ मत्स्यव्यवसाय यासाठी पावले आवश्यक आहेत. हवामान बदलाशी सामना करायचा असेल तर पर्यावरणपूरक विकास, सुरक्षित किनारपट्टी आणि आत्मनिर्भर ग्रामीण अर्थव्यवस्थेचेही अनुकरणे करावे लागणार आहे.**

# अलिबाग नगर परिषदेची निवडणूक चुरशीची होणार

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**



अलिबाग नगर परिषदेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूकीसाठी नगराध्यक्ष आणि प्रभागांचे आरक्षण निश्चित झाल्यामुळे राजकीय पक्षांनी मोर्चे बांधणीला सुरुवात केली आहे. पक्षांकडून संभाव्य उमेदवारांची चाचपणी सुरू झाली आहे. संभाव्य उमेदवारांचा शोध घेऊन त्यांच्या कागदपत्रांची जुळवाजुळव करण्याचे काम राजकीय पक्षांनी सुरू केले आहे. अलिबाग नगर परिषदेवर मागील ३० वर्षे शेकापची सत्ता आहे. मागील काही वर्षांमध्ये घडलेल्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर होणारी ही निवडणूक शेकापसाठी सोपी नाही. सर्वच पक्ष तकदीने ही निवडणूक लढवणार आहेत. त्यामुळे अलिबाग नगर परिषदेची यंदाची निवडणूक चुरशीची हाणार आहे.

अलिबाग नगर परिषदेचे १० प्रभाग असून प्रत्येक प्रभागातून २ सदस्य निवडून येणार आहेत. एकणू २० सदस्य निवडून येतील त्यातील ५० टक्के म्हणजेच १० जागा महिलांसाठी राखीव झाल्या आहेत. १० जाग महिलांसाठी राखीव झाल्या आहेत. यातील ४ जागा सार्वधारण महिलांसाठी, ३ जागा नागरिकाचा मागासप्रर्गातील महिलांसाठी , अनुसूचित जमातींच्या महिलांसाठी २ तर अनुसूचित जातीच्या महिलांसाठी १ जाग राखीव झाली आहे.

अलिबाग नगर परिषदेचे नगाराध्यक्षपद सर्वसाधारण महिलांसाठी राखी झाले आहे. त्यातुळे नगराध्यक्षपदासाठी योग्य उमेदवार निवडण्याची तयारी सर्वच पक्षांनी सुरू केली आहे. कॉग्रेस आघाडी, शिवसेना, शेकाप अशी लढत व्हायची. आता काँग्रेस कमकुवत झाली आहे. शिवसेनाचे दोन गट झाले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसची फारशी ताकद अलिबाग शहरात नाही. परंतु ॲड. प्रविण ठाकूर यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेश पक्षात प्रवेश केल्यामुळे या पक्षाची तागद वाढली आहे. शेकापदेखील एकसंध राहली नाही. अलिबाग शहारात शेकापचे प्रशांत नाईक यांची खरी ताकद आहे.

पूर्वी अलिबाग शहरात भाजपची ताकदच नव्हती. आत नवीन समिकरणांमुळे भाजपची ताकददेखील वाढली आहे. यावेळी युती आघाडी होण्याची शक्यत कमी आहे. सर्वच पक्ष स्वबळावर निवडणूक लढवण्याची शक्यता जास्त आहे. त्यामुळे यंदाची निवडणूक रंगतदार होईल. सर्वच पक्षांसमोर आव्हान असेल ते महिला उमेदवार शोधण्याचे, कारण अलिबागचे नगराध्यक्षपद सर्वसधारण महिलांसाठी राखवी आहे. त्याचबारोबर १० नगरसेवक पदांसाठी महिला उमेदवार शोधाव्या लागणार आहेत. त्यासाठी धावपळ सुरू आहे. नगराध्यक्ष पदासाठी सर्वच पक्षांमध्ये इच्छुक उमेदवारांमध्ये चुरस आहे. त्यामुळे पक्ष कुणाला तिकीट त्यावर बरच काही अवलंबून असेल.

मागील ३० वर्षे अलिबाग नगर परिषदेवर शेकापची सत्ता आहे. त्यामुळे शेकापसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची असणार आहे. या पक्षाकेडे अलिबाग शहरात अनेक महिला नेत्या आहेत. त्यामुळे त्यांना उमेदवार मिळवणे कठीण नाही, मात्र या सर्वांमधून योग्य उमदवार देणे हे त्यांच्यासाठी आव्हान असेले.

सध्यातरी शेकापमध्ये ॲड. मानसी म्हत्रे, डॉ. नीलम हजारे ही नावे चर्चेत आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून ॲड. कविता ठाकूर यांनी पक्षाकड उमेदवारी मागीतली आहे. कॉंग्रेस पाक्षाकडून ॲड. श्रध्दा ठाकूर, भाजपकडून वर्षा शेठ यांच्या नावाची चर्चा आहे. शिवसेनेने आपली भूमिका अजनू स्पष्ट केली नाही. यंदाच्या अलिबाग नगर परिषदेच्या निवडणूकीत आमदार महेंद्र दळवी काय भूमिका घेतील याच्यावर बरच काही अवलंबून असेल.

### निवडणूक आरक्षण

**नगराध्यक्ष** : महिला सर्वसाधारण
**प्रभाग क्रमांक १** अ) नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग (सर्वसाधारण) ब) सर्वसाधारण (महिला)
**प्रभाग २** अ) अनुसूचित जमाती (महिला) ब) सर्वसाधारण
**प्रभाग ३** अ) नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) ब) सर्वसाधारण
**प्रभाग ४** अ) नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) ब) सर्वसाधारण
**प्रभाग ५** अ) अनुसूचित जाती (महिला) ब) सर्वसाधारण
**प्रभाग ६** अ) नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग (सर्वसाधारण) ब) सर्वसाधारण (महिला)
**प्रभाग ७** अ) सर्वसाधारण (महिला) ब) सर्वसाधारण
**प्रभाग ८** अ) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) ब) सर्वसाधारण
**प्रभाग ९** अ)अनुसूचित जमाती (महिला) ब) सर्वसाधारण
**प्रभाग १०** अ)अनुसूचित जमाती (सर्वसाधारण) ब) सर्वसाधारण (महिला).

# अपेक्षाभंगाचं दुःख की अनपेक्षित सुखाचा स्वीकार?

अपेक्षाभंगाचं दुःख गिरविण्यापेक्षा अनपेक्षित सुखाचा स्वीकार करावा. बऱ्याचदा समोरच्याकडून आपण खूप अपेक्षा करतो, पण तसं घडलं नाही तर त्याचं दुःख आपल्यालाच होतं. म्हणून स्वतःला समजवायला हवं कुणाकडून किती, कसल्या अपेक्षा करायच्या? अपेक्षा करायच्या की, नाही? अपेक्षा करायच्या असतील तर त्या का करायच्या...?

खरंच समोरील व्यक्ती तितकी विश्वासु असते म्हणून की, आपली वाटते म्हणून. बरं तो विश्वास व आपलेपणा आपल्याला वाटतो, पण तीच भावना समोरच्याच्या मानात असेल हे कशावरून? तीच भावना समोरच्या व्यक्तीला असावी हा अट्टहास तरी का? प्रत्येक व्यक्ती एक स्वतंत्र अस्तिव आणि प्रत्येकाने त्याचं स्वातंत्र्य अबाधित ठेऊनच वागलं पाहिजे. असं असेल तर मग अपेक्षा का ठेवाव्यात? कधी कधी समोरील व्यक्ती अपेक्षेप्रमाणे वागणार हे माहिती असतं, पण परिस्थिती तशी नसते. ती व्यक्ती कोणत्या तरी व्यापात, संकटात असते मग अशा वेळी काय करायचं? कुणाला दोष द्यायचा? परिस्थितीला, त्या व्यक्तीला की आपण अपेक्षा ठेवल्या म्हणून स्वतःला, की कुणालाच नाही?

मनासारखं झालं नाही म्हणून रागवायचं, वाईट वाटून घ्यायचं, दुःख करत बसायचं की सोडून द्यायचं? तेही जाउदे सोडून दिलं तर मग आपल्याला गृहीत धरलं जातं. मग अशा वेळी वाटतं कुणाकडूनही कसल्याच अपेक्षा करायच्या नाहीत. कितीही जवळची, आपली वाटणारी व्यक्ती असली तरी कोणत्याच अपेक्षा करायच्या नाहीत. असं केल्याने मनावरचा ताण कमी होण्यास नक्कीच मदत होईल आपल्या व समोरच्याचाही.

अपेक्षा नसल्याने भंग पावल्याचं दुःख होणार नाही. त्यामुळे आनंदी राहण्यास मदत होईल. असा विचार जरी केला तरी माणूस म्हणून जगताना कधीतरी एका क्षणासाठी का होईना मन वेड्यासारखं वागतंच. अशा वेळी काय करायचं पुन्हा प्रश्न पडतो.

अशा वेळी अनपेक्षित सुखाचा स्वीकार करायचा. कधी कधी एकाच वेळी अपेक्षाभंग पावल्याचं दुःख तर त्याच क्षणी अपेक्षित नसलेल्या काही चांगल्या घटना घडतात. मग त्या आनंदाचा मानापासून स्वीकार करायचा. म्हणजे सुख लागतं किंवा कधी कधी ज्या व्यक्तीमुळे भ्रमनिरास होतो तीच व्यक्ती एखाद्या वेळी असं काही वागते की, प्रश्न पडतो अरे ही तीच व्यक्ती आहे का? जिच्यामुळे मनाला यातना झाल्या तीच आज तुमच्यासाठी, तुमच्या आनंदासाठी, तुमच्या आवडी-निवडी लक्षात ठेवून वागत आहे. मग अशा वेळी मागचं सारं विसरून अनपेक्षित सुखाचा स्वीकार करावा.

कोणतंही मनापासून जपलेलं नातं टिकवायचं असेल तर त्या नात्याकडून कोणत्याच अपेक्षा करायच्या नाहीत. नफा वा तोट्याचा व्यवहार तिथे आणायचा नाही. तुम्हाला जे योग्य वाटतं ते करायचं. त्यातून तुम्हाला काय मिळेल हे पाहण्यापेक्षा समोरच्याला आनंद कसा मिळेल हे पहायचं. तुम्हाला जे जे करणं शक्य होईल ते करायचं. जे जे देणं शक्य होईल ते भरभरून द्यायचं, कारण काहीतरी मिळविण्यापेक्षा देण्यात जो आनंद आहे तो कशातच नाही आणि त्यातून मिळणाऱ्या अनपेक्षित सुखाचा मनापासून स्वीकार करावा.

**-ऋतुजा म्हात्रे-महामुनी, पनवेल**




## यूट्यूब व्हिडीओ लाईक करून गमावले ५६ लाख



व्हॉट्सॲप आणि यूट्यूबसारख्या प्रसिद्ध प्लॅटफॉर्मवर मोठ्या प्रमाणात फसवणुकीची अनेक प्रकरणं समोर येत आहेत. यूट्यूब व्हिडीओ लाइक करण्याच्या नावाखाली लाखो रुपयांची फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना नुकतीच समोर आली आहे.


सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर व्हिडीओ लाईक करण्याच्या बदल्यात पार्ट टाईम जॉबचं आश्वासन दिलं जात आहेत आणि हॅकर्स त्यांचा हेतू पूर्ण करतात. रिपोर्टनुसार हॅकर्सनी सहज पैसे कमावण्याच्या आशेने एका दुकानदाराची तब्बल ५६ लाखांची फसवणूक केली.

सुरुवातीला दुकानदाराला यूट्यूबवर काही कामासाठी १२३ रुपये आणि ४९२ रुपये मिळाले. यामुळे खूश झालेल्या दुकानदाराला फसवणुकीत अडकवण्यात आलं. त्याला एका टेलिग्राम ग्रुपमध्ये जोडण्यात आलं, जिथे त्याला कमिशनचे आमिष दाखवून पैसे जमा करण्यास सांगण्यात आलं. दुकानदाराला हे समजलं नाही, त्याने ५६.७ लाख रुपये गुंतवले, मात्र त्यानंतर स्कॅमर्सनी त्याच्याशी संपर्क करणे बंद केलं आणि ही फसवणूक उघडकीस आली.

फसवणुकीपासून वाचण्यासाठी या टिप्सचा वापर करा

- कोणत्याही ऑनलाईन एक्टिव्हिटीमध्ये सहभागी होण्यापूर्वी, एखादी कंपनी किंवा व्यक्तीबद्दल योग्य रिसर्च केला पाहिजे.
- ऑनलाईन ऑफर्स आणि डिस्काउंट्स योग्यरित्या जाणून घ्या.
- व्हिडीओ लाईक करण्यासारख्या साध्या कामाच्या बदल्यात पैशाचे आमिष दाखवणाऱ्यांपासून सावध राहा.
- अनोळखी व्यक्ती आणि गटांकडून येणाऱ्या मेसेजपासून सावध राहा.
- तुम्हाला कोणत्याही ऑफरबद्दल शंका असल्यास, इतरांचा सल्ला घ्या. यामध्ये तुम्ही मित्र, कुटुंब किंवा सायबर सुरक्षा तज्ज्ञांचा समावेश करू शकता.
- तुमचे पर्सनल डिटेल्स जसं की बँक तपशील, पासवर्ड किंवा जढ्ढ ऑनलाईन कोणाशीही शेअर करू नका.
- याशिवाय डिजिटल अरेस्टपासून सतर्क राहा.

# लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल



**निमित्त**

देशाच्या राजकीय अन् सामाजिक जीवनात पोलादी पुरुष (आयर्न मॅन) म्हणून ओळख असलेल्या सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ऑक्टोबर १८७५ रोजी गुजरात राज्याच्या खेडा जिल्ह्यातील करमसद येथे झाला अन् ब्रिटिश राजवटीला तगडं आव्हान देणारा जणू देशात पोलादी पुरुषच उदयास आला.वल्लभभाई यांच्या वडिलांचे नाव झवेरभाई तर,आईचे लाडबाबेन.वयाच्या १८ व्या वर्षी त्यांचा विवाह झवेरबा यांच्याशी झाला. त्यांना डाह्याभाई अन् मनिबेन ही दोन अपत्ये.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या अहिंसा व सत्याग्रह या तत्वांवर देशाला स्वातंत्र्य प्राप्तीसाठी जो लढा उभारला गेला,त्यात वल्लभभाई हे अग्रस्थानी होते.या लढ्या दरम्यान त्यांना गांधीजीसह अनेक वेळा कारावास भोगावा लागला.त्यापूर्वी इंग्लंडमध्ये बॅरिस्टर पदवी संपादन केल्यावर त्यांनी काही काळ वकिली केली.परंतु भारताला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी वकिली सोडून थेट स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली. त्यांचा राष्ट्रीय काँग्रेस पक्षावर मोठा दबदबा होता. त्यांना राष्ट्रीय काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष पद भूषविण्याचा मान मिळाला.

पारतंत्र्याच्या काळात शेतकऱ्यांवर जुलमी कर लादणाऱ्या ब्रिटिश सरकारविरुद्ध स्व.वल्लभभाई पटेल यांनी रणशिंग फुंकले. मिठाचा सत्याग्रह केल्याबद्दल इंग्रज पोलिसांकडून अटक झालेले ते प्रमुख नेते होते. महात्मा गांधी यांच्या छोडो भारत आंदोलनात त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. इतकेच नव्हे तर, विदेशी मालाची होळी करून, सरदार पटेल यांनी खादीचे कपडे व स्वदेशी साहित्य वापरण्याचे भारतीयांना जाहीर आवाहन केल्याने त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. ते महान देशभक्त अन् लढवैये स्वातंत्र्यसेनानी होते. त्यामुळेच त्यांना जनमानसाकडून पोलादी पुरुष ही उपाधी मिळाली.


विविध राज्यातील राष्ट्रप्रेमी नेते, देशभक्त सत्याग्रही अन् क्रांतिकारकांच्या समर्पित बलिदानातून अखेर भारताला स्वातंत्र्य मिळाले अन् इंग्रजांची राजवट संपुष्टात आली. स्वातंत्र्यानंतर पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या केंद्रीय मंत्रिमंडळात सरदार वल्लभभाई पटेल यांची गृहमंत्री म्हणून निवड झाली.तसेच त्यांना उप पंतप्रधान होण्याचादेखील मान मिळाला. गृहमंत्री असतानाच्या काळात हिंदुस्थानातील ५६५ अर्धस्वायत्त संस्थानांचे देशामध्ये विलिनीकरण करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता.त्यामुळे त्यांची प्रतिमा जनमानसात अधिकच उजळली. देशाची एकता, अखंडता व सार्वभौमत्व अबाधित ठेवण्यासाठी त्यांनी आपलं सारं आयुष्य पणाला लावलं.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील भरीव योगदानाबद्दल कृतज्ञतेच्या भावनेतून त्यांच्या नावाने विविध शैक्षणिक संस्था उभारल्या गेल्या. तसेच सरदार सरोवर ड्याम, सरदार वल्लभभाई पटेल युनिव्हर्सिटी, स्टेडियम, इंटरनॅशनल एअरपोर्ट आणि सर्वात प्रेक्षणीय स्थळ म्हणजे जगातील सर्वात उंच सरदार वल्लभभाई यांचा Statue of Unity of India हा भव्यदिव्य पुतळा उभारण्यात आला आहे

**(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा






## आरोग्य प्रहर

### लिव्हर खराब झाले, तर हातांवर दिसतात 'ही' लक्षणे

जेव्हा यकृताचे कार्य बिघडते तेव्हा १. लालसर तळहात -हातांच्या तळव्यावर, विशेषतः अंगठा आणि करंगळीच्या खाली जर लालसरपणा दिसत असेल, तर तो यकृताच्या कार्यातील बिघाडाचं संकेत असू शकतो. यकृताच्या आजारात शरीरात एस्ट्रोजेन हार्मोनचं प्रमाण वाढतं, ज्यामुळे रक्तवाहिन्या फुगतात आणि तळवे लाल दिसतात. हे लक्षण कधी कधी निरोगी व्यक्तींमध्येही आढळू शकतं, तरी वारंवार दिसल्यास वैद्यकीय सल्ला घेणं गरजेचं आहे.




२. हात वाकडे होणं - या स्थितीत तळहाताखालील त्वचा जाडसर आणि आकुंचन पावते, ज्यामुळे बोटं हळूहळू वाकलेली राहतात.हे लक्षण दीर्घकाळ यकृताशी संबंधित आजारांमध्ये विशेषतः सिरोसिस मध्ये दिसू शकतं. अल्कोहोलचे सेवन, मधुमेह आणि आनुवंशिक कारणेदेखील यास कारणीभूत ठरू शकतात.

३. 'टेरी नेल्स'- नखांच्या टोकाला जर पांढुरका रंग आणि बेसला फक्त गुलाबी पट्टा दिसत असेल, तर यकृतातील प्रथिनांची आणि रक्तप्रवाहातील असंतुलनाची शक्यता असते. ही स्थिती सिरोसिस, हृदयविकार किंवा मधुमेहामध्येही दिसू शकते.

अशा वेळी नखे केवळ सौंदर्याचा आरसा नसतात, तर ते शरीरातील गंभीर बदलांचं प्रतिबिंब असतात.

४. नखांचा आकार बदलणे- बोटांच्या टोकांना गोलाई येणं आणि नखं जाडसर दिसणं हे ऑक्सिजनच्या कमतरतेचं आणि यकृताच्या कार्यात बिघाडाचं संकेत ठरू शकतं. हे लक्षण फुप्फुस, हृदय आणि यकृताच्या दीर्घकालीन आजारांमध्ये आढळतं, त्यामुळे हे बदल दिसल्यास तपासणी आवश्यक आहे.

५. हातांची थरथर -कधी कधी हात आणि मनगट अनियंत्रितपणे थरथरतात-ही लक्षणं गंभीर यकृत स्थितीत दिसतात, जेव्हा शरीरातील विषारी द्रव्ये मेंदूपर्यंत पोहोचतात.


६. हातापायांना खाज सुटणं -जर हातांच्या तळव्यांना आणि पायांच्या तळांना अचानक, सतत खाज सुटत असेल आणि कोणतेही पुरळ दिसत नसेल, तर तेही यकृतातील पित्तप्रवाह अडकल्याचं संकेत असू शकतं. ही स्थिती Cirrhosis मध्ये सामान्य आहे आणि रात्री विशेषतः वाढते.ही लक्षणं तात्पुरती असू शकतात, पण दुर्लक्ष केल्यास मोठ्या आजाराचं रूप घेऊ शकतात.

# मोंथा वादळामुळे श्रीवर्धनमध्ये फटका

## मासळीची आवक घटली, पर्यटकांची संख्या रोडावली

**श्रीवर्धन : बातमीदार**

अरबी समुद्रामध्ये मागील काही दिवसां पासून कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला होता. त्यामुळे समुद्र मोठ्या प्रमाणावर खवळलेला आहे. तसेच पाऊस देखील पडत आहे. अरबी समुद्रात पश्चिमेला अंदाजे ७०० ते ८०० किलोमीटर आत मध्ये कमी दाबाच्या पट्ट्याचे रुपांतर 'मोंथा' चक्रीवादळात झाले आहे. मोंथा चक्रीवादळाचा फटका श्रीवर्धनच्या पर्यटन व्यवसायाला बसला असून पर्यटकांची संख्या या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणात रोडावली आहे. तर मासेमारीला सुद्धा चक्रीवादळाच्या तडाख्यामुळे मासेमारांनी आपल्या बोटी किनाऱ्यावर घेतल्या आहेत.



पावसाळा संपल्यानंतर मासेमारीचा हंगाम सुरू होतो. परंतु यावर्षी सातत्याने खराब हवामानामुळे मासेमारांची फारच फरपट झालेली आहे. मे महिन्यातच पावसाळा सुरू झाल्यामुळे, यावर्षी महिनाभर अगोदर मासेमारी बंद झाली व पर्यटन व्यवसाय देखील बंद झाला होता. आता पावसाळा संपता संपता दिवाळी होऊन गेल्यानंतर देखील वातावरण खराब असल्यामुळे व समुद्र पुन्हा एकदा खवळलेला असल्यामुळे मासेमारांना याचा फटका सहन करावा लागत आहे. तर या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणावर असलेल्या पर्यटन व्यवसायिकांना देखील खराब वातावरणामुळे नुकसान सहन करावे लागत आहे. याचा फटका या वर्षी भात पिकवणाऱ्या शेतकऱ्यांनादेखील बसलेला आहे. शासनाने मच्छीमारांना व शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी अशी मागणी केलीय.

# 'कुंडलिका'काठची पाणपोई बनलीय धूम्रपानाचे ठिकाण




**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा नगर परिषदेच्या हद्दीतील कुंडलिका नदीकाठी रोटरी क्लब ऑफ रोहा सेंटर यांच्या वतीने उभारण्यात आलेली पाणपोई सध्या पूर्णतः दुर्लक्षित अवस्थेत आहे. पिण्याच्या पाण्यासाठी उभारलेली ही पाणपोई आज पाण्याविना पडून असून गावठी दारूच्या पिशव्या , बियर बाटल्या यालट सिगारेट आणि तंबाखू सेवनाचे ठिकाण बनली आहे. ही पानपोई बंद २४ तास दरवाजा उघडा असतो अशीच परिस्थिती नेहमी दिसून येत असते.

पाचपाई टपरीजवळील ही पाणपोई दिवसा आणि रात्रीसुद्धा उघडीच असते. त्यामुळे काही युवक येथे थांबून धुम्रपान करतात, परिसरात कचरा टाकतात आणि दुर्गंधी पसरवतात. परिणामी कुंडलिका नदी संवर्धन क्षेत्र अस्वच्छ होत असून, येथे वॉकिंगसाठी येणाऱ्या महिला व ज्येष्ठ नागरिकांमध्ये प्रचंड



नाराजी निर्माण झाली आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, रोटरी क्लबने समाजोपयोगी काम म्हणून पाणपोई दिली, पण नगर परिषदेने तिची देखभालच केली नाही. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही, आणि या ठिकाणी रोज धुम्रपान चालते. प्रशासन झोपले आहे का? असा संवाद सुद्धा नागरिकांतून उपस्थित केला जात आहे .

याबाबत नागरिकांनी स्पष्ट मागणी केली आहे की, रोहा नगर परिषदेने तातडीने या पाणपोयीतील पाण्याची व्यवस्था पुनर्संचयित करावी, परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी उपाययोजना कराव्यात आणि पोलीस प्रशासनासोबत समन्वय साधून धुम्रपान करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी आहे.

# सावंत हायस्कूलचे बाबुराव कांबळे यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार

**माणगाव :** माणगाव तालुक्यातील जे. बी. सावंत हायस्कूल, पन्हळघर-लोणेरे या शाळेचे मुख्याध्यापक बाबुराव कांबळे यांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळ, मुंबई यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय समारंभात आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार २०२५ देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार समारंभ कराड येथे मोठ्या उत्साहात पार पडला.या यशाबद्दल बोलताना कांबळे सर म्हणाले की,हा सन्मान माझा एकट्याचा नसून, माझ्या संपूर्ण संस्थेचा आहे. मला सदैव प्रेरणा आणि पाठबळ देणाऱ्या पन्हळघर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यवाह नाना सावंत यांचे आभार मानतो.




**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**
**पिनकोड-४१०२०६**

E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in

दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स - ०२२-२७४६७४४०

**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. २९ (ई-निविदा) सन २०२५-२६**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सूचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

**टिप** - या निविदेमध्ये एकूण ०३ कामे समाविष्ठ असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक ३०.१०.२०२५ सकाळी १०.०० ते दिनांक ०६.११.२०२५ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड
दिनांक : ३०/१०/२०२५

**सही/-**
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम
विभाग, पनवेल

**उरण नगरपरिषद**
**जिल्हा रायगड**
**जाहीर सूचना**

मा. राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्र.रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.३/का-८ दिनांक १६ जुलै,२०२५ अन्वये उरण नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता मतदार यादीचा कार्यक्रम निश्चित केल्याप्रमाणे व मा. राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. रानिआ/नप-२०२५/प्र.क्र.०९/का-६ दिनांक ३०/०९/२०२५ अन्वये अधिसूचित केलेल्या दिनांकास म्हणजे ०१/०७/२०२५ रोजी अस्तित्वात आलेली १९० उरण विधानसभा मतदारसंघाच्या मतदार यादी वरुन मा. जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील आदेश क्र.नपाप्र. कार्या-४/न.प.सा.नि/मतदार यादी कार्यक्रम/२०२५/२१२ दिनांक ०६/१०/२०२५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार उरण नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणूकी करिता १ ते १० बहुसदस्यीय प्रभागाच्या अंतिम मतदार याद्या तयार करण्यांत आल्या आहेत. सदरच्या मतदार याद्या नागरीकांना पाहण्यांसाठी आज दिनांक ३१/१०/२०२५ खालील ठिकाणी प्रसिध्द येणार आहेत. सदर याद्या निम्नलिखित स्थळी उपलब्ध असतील.

१) उरण नगरपरिषद कार्यालय नोटीस बोर्डावर २) तहसिल कार्यालय उरण जि.रायगड ३) उरण नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र.३ मोरा-उरण ४) उरण नगरपरिषद संकेतस्थळ https://mahaulb.in/PortalSite//app/home

उरण नगरपरिषद कार्यालय
उरण, दिनांक ३१/१०/२०२५

**सही/-**
**(समीर जाधव)**
मुख्याधिकारी
उरण नगरपरिषद, उरण

जा.क्र.उनप/सा.प्र.वि./
अं.मतदारयादी/१८९८/२०२५-२०२६


# शाळांमध्ये पायाभूत सोयी-सुविधा अनुदान योजनेसाठी प्रस्तावांचे आवाहन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून अल्पसंख्याक बहुल शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत पात्र संस्थांना रु.१० लाखांपर्यंत अनुदान देण्यात येईल. जिल्ह्यातील इच्छुक शाळांनी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता विहीत नमुन्यातील अर्जासह परिपूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग येथे करावे.


**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

कार्यालय : आयुक्त मुख्यालय, २रा मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल-४१०२०६.
दुरध्वनी क्र. ०२२-२७४५८०४०/४१/४२
Email Id : panvelcorporation@gmail.com

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.५४६/५६८/२०२५ दिनांक : ३०/१०/२०२५

**अंदाजपत्रक बनविणेकामी**

| अनु.क्र. | प्रकरण क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | पमपा/मातंवि/२१२५/ प.क्र. १०/३९५/२०२५-२६ | पनवेल महानगरपालिकेत Smart TV , ऑल इन वन संगणक संच व एक लॅप टॉप खरेदी करणेकामी बाजारभाव मागविणेबाबत. |

सदर बाबतची दरपत्रके दि. ३१/१०/२०२५ ते ०६/११/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत माहिती व तंत्रज्ञान विभाग, पनवेल महानगरपालिका येथे सादर करण्यात यावी. सदर कामाबाबतची विस्तृत माहिती माहिती पनवेल महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागात प्राप्त होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
उप आयुक्त (मातंवि)
पनवेल महानगरपालिका

**जाहीर नोटीस**
**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर, यांचे न्यायालयात**
तालुका खालापूर, जि. रायगड
दुरध्वनी क्रमांक ०२१९२/२७५०४८ ईमेल- tahasil.khalapur@gmail.com

क्र.जन्म/रजि./एस.आर.०७/२०२५/७९६१

१) श्रीम. अरुण हरिभाऊ जाधव,
रा. चिंचवली, शेकिन, ता. खालापूर, जि. रायगड .............. **वादी**
**विरुध्द**
१) निबंधक, जन्म - मृत्यु नोंदणी अधिकारी,
मुख्याधिकारी खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड .......... **प्रतिवादी**

**विषयः- जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार **श्रीम अरुण हरिभाऊ जाधव, रा. चिंचवली, शेकिन, ता. खालापूर जि. रायगड (अपिलार्थी)** यांनी त्यांचे भाऊ कै. लक्ष्मण हरिभाऊ जाधव यांचा मृत्यू दिनांक २६/१०/२०१९ रोजी मौजे चिंचवली, शेकिन, ता. खालापूर येथे झाला आहे. सदर मृत्यूची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मृत्यूची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि.०८/१०/२०२५ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली असे.

ठिकाण :- खालापूर
दिनांक ०८/१०/२०२५

**सही/-**
**(अभय चव्हाण)**
कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसिलदार खालापूर

**उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान**
जिल्हा व्यवस्थापन कक्ष, कुंटे बाग, जुने सभापती निवासस्थान, अलिबाग-रायगड पिन-४०२२०१

जा.क्र. NRLM/रायगड/कार्या-३/७७५/२०२५

**जाहिरात**
**उमेद -IFC प्रकल्प अंतर्गत पद भरती, जिल्हा-रायगड**

जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, रायगड अंतर्गत अलिबाग १, महाड १,पेण १, पनवेल १, रोहा १, माणगाव १, असे सहा BLOCK ANCHOR यांची निवड करायची आहे, तसेच अलिबाग ३, महाड ३, पेण ३, पनवेल ३, रोहा ३ माणगाव ३ अश्या एकूण १८ वरिष्ठ समुदाय संसाधन व्यक्ती यांची निवड करावयाची आहे. सदर पदाकरिता अर्जाचा नमुना, निवड निकष पात्रता, भूमिका, जबाबदारी मानधन निवड पद्धत लेखी व तोंडी परीक्षेचे निकष या बाबतची सविस्तर माहिती प्रत्येक तालुक्यातील तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, पंचायत समिती, येथे उपलब्ध असेल त्याचे वाचन करावे व अर्जाच्या विहित नमुन्यात सदर पदाकरिता दिनांक ०७/११/२०२५ रोजी सायंकाळी ५.३० पर्यंत अर्ज सादर करावेत. या करिता उमेद तालुका कार्यालयातील तालुका अभियान व्यवस्थापक यांना खालील प्रमाणे दिलेल्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

१. माधुरी अशोक सकपाळ ९४२२००२१२७
२. संचित सुनिल पार्टे ९६३७६८९१६०
३. समीर प्रभाकर चांदे ७६२०७११७९९
४. अक्षय उद्धव खंदारे ९८३४३१३३०८
५. स्वप्नील भीमराव जाधव ९७६५६७९७६७
६. हर्षल अवधूत परब ९१७५४०६८५०

अधिक माहिती करिता किवा समस्या उद्भवल्यास MSRLM उमेद जिल्हा रायगड कार्यालयातील श्री. सिद्धेश चंद्रकांत राऊळ जिल्हा व्यवस्थापक उपजीविका यांना ९८२३९८६७४७ या क्रमांकावर संपर्क करावा.

**टीप :** प्रभागसंघाच्या वतीने तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, पंचायत समिती, येथे उमेदवारांना अर्ज देणे, माहिती देणे व अर्ज स्वीकारण्याचे कार्य पाहतील आलेल्या अर्जांची छाननी प्रभाग स्तरीय निवड समिती करेल.

दिनांक : ३०/१०/२०२५

**सही/-**
**प्रकल्प संचालक**
जि.ग्रा.वि.य. तथा
जिल्हा अभियान सहसंचालक
रायगड अलिबाग

**जाहीर नोटीस**
**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर, यांचे न्यायालयात**
तालुका खालापूर, जि. रायगड
दुरध्वनी क्रमांक ०२१९२/२७५०४८ ईमेल- tahasil.khalapur@gmail.com

क्र.जन्म/रजि./एस.आर.१६/२०२५

१) श्रीम. निनम किशोर जांभुळकर,
रा. वडगांव, ता. खालापूर .................. **वादी**
विरुध्द
१) निबंधक, जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली, ता. खालापूर, जि. रायगड ........ **प्रतिवादी**

**विषयः- जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार **श्रीम. नितम किशोर जांभुळकर, रा. वडगांव, ता. खालापूर (अपिलार्थी)** यांनी यांची आई कै. कल्पना ज्ञानेश्वर भोपी यांचा मृत्यू दिनांक ११/१०/१९९० रोजी मौजे लोधिवली, ता. खालापूर येथे झाला आहे. सदर मृत्यूची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मृत्यूची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि.१७/१०/२०२५ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली असे.

ठिकाण:- खालापूर
दिनांक १५/१०/२०२५

**सही/-**
**(अभय चव्हाण)**
कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसिलदार खालापूर

**नमुना एन. डी.**
(नियम ९२(३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, मोटार वाहन क्र. MH46 CH 0383 चे मालक **धर्मा हाशा म्हात्रे** यांचे तारीख ३/०१/२०२४ रोजी निधन झालेले आहे.

मी **सुलोचना धर्मा म्हात्रे,** पत्ता : ४१३, साई मंदिर मागे, खेरणे, देवीचा पाडा, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव - सुलोचना धर्मा म्हात्रे**
**पत्ता-** ४१३, साई मंदिर मागे, खेरणे, देवीचा पाडा, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड
**दिनांक :** ३०/१०/२०२५

**नमुना एन. डी.**
(नियम ९२(३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, मोटार वाहन क्र. MH46 AU 9269 चे मालक **वैजयंती सोपान पाटील** यांचे तारीख १३/०७/२०२१ रोजी निधन झालेले आहे.

मी **सोपान शालीक पाटील,** पत्ता : घर नं. ३८०/बी, वामन बाबा मंदिर , तळोजा मजकूर, ता. पनवेल, जि. रायगड उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव - सोपान शालीक पाटील**
**पत्ता-** पत्ता : घर नं. ३८०/बी, वामन बाबा मंदिर, तळोजा मजकूर, ता. पनवेल, जि. रायगड
**दिनांक :** ३०/१०/२०२५

**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

कार्यालय : आयुक्त मुख्यालय, २रा मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल-४१०२०६.
दुरध्वनी क्र. ०२२-२७४५८०४०/४१/४२
Email Id : panvelcorporation@gmail.com

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.५४४/५६३/२०२५

**शहर अभियंता विभाग**
**दरपत्रक**

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता अंदाजपत्रक तयार करण्यासाठी खालील कामासाठी दरपत्रक (Market Rate) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | मुदत |
|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील कामोठे येथील सेक्टर-३२, भूखंड क्र.०५ (क्षेत्र ६९०५.३२ चौ.मी.) या जागेत अग्निशमन केंद्राचे बांधकाम करणे. | ३१/१०/२०२५ ते ०७/११/२०२५ (०७ दिवस) |

या कामाच्या दरपत्रकाबाबतची माहिती पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दि. ३१/१०/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. सदर बाबींचे बाजार भाव स्वतःच्या लेटरहेडवर महानगरपालिका कार्यालयात अथवा pmbandhkamdep01@gmail.com व panvelcorporation@gmail.com या ई-मेलवर मुदतीत पाठविण्यात यावे ही विनंती. सदर दर हे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी आहेत. याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : ३०/१०/२०२५

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त-I**
पनवेल महानगरपालिका

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ५१/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | अलिबाग प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती ..... पोयनाड येथील जलशुद्धीकरण केंद्रातील वॉश वॉटर रिसायकलिंग सिस्टमचे परिचालन व देखभाल दुरूस्ती करणे. | ₹ ३९,२८,४९०.०० |
| २ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती... रोहा जलशुद्धीकरण केंद्रात प्री-क्लोरीनेशन व्यवस्था पुरविणे, संबंधित कामे करणे व आवश्यक सुरक्षा उपकरणे पुरविणे. | ₹ १५,९६,३६७.०० |
| ३ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील अग्निशमन केंद्र कार्यालयातील प्रयोगशाळा, जिम, ३० केव्हीए डिझेल जनरेटर, एअर कंडिशनर्स व वॉटर कूलरची दोन वर्षांसाठी वार्षिक तत्वावर देखभाल दुरूस्ती करणे. | ₹ ७,४८,५०९.०० |
| ४ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... रोहा येथील विद्युत यांत्रिकी उपविभाग कार्यालयाकरीता बसण्याची व्यवस्था पुरवणे. | ₹ १६,१४,०१०.०० |
| ५ | खांदा कॉलनी, पनवेल येथील प्रशासकीय इमारत व कर्मचारी वसाहतीची देखभाल व दुरुस्ती करणे..... खांदा कॉलनी, पनवेल येथील प्रशासकीय इमारत व कर्मचारी वसाहत व परिसरतील पार्किंग क्षेत्रे, रस्त्यांची साफसफाई, व्यवस्थापन व देखभाल करणे. | ₹ ३७,९२,५०४.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक ३१/१०/२०२५ ते दिनांक १४/११/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक ०३/११/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ०६/११/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# पनवेल महापालिका करणार पाण्याचा पुनर्वापर

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिकेच्या क्षेत्रात वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या गंभीर समस्येवर तोडगा काढण्यासाठी प्रशासनाने पाण्याचा पुनर्वापर हा नाविन्यपूर्ण पर्याय पुढे आणला आहे. सध्या सिडकोच्या वसाहतीतील रहिवाशांनी अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे सिडकोने बांधून विक्री केलेली घरे सध्याच्या बाजारभावाने परत घ्यावीत, अशी आर्जवी मागणी केली असताना, पनवेल महापालिकेने 'प्रक्रिया केलेल्या पुनर्वापर पाणी वापरा' या संकल्पनेवर आधारित दीर्घकालीन उपाययोजना आखली आहे.



महाराष्ट्र इन्स्टिटच्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) संस्थेच्या माध्यमातून वर्ल्ड बँकेचे प्रतिनिधी पनवेल महापालिकेत भेटीस आले. या बैठकीत आयुक्त मंगेश चितळे आणि अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी पाणीपुरवठा, स्वच्छता आणि पुनर्वापर या प्रकल्पांची सविस्तर माहिती सादर केली. सध्या पनवेल महापालिका क्षेत्राला २५८ एमएलडी पाण्याची गरज असली तरी, सुमारे २९ एमएलडी पाणी कमी पडत असल्याने नागरिकांना कमी दाबाने पाणीपुरवठा करावा लागतो. भविष्यातील विस्तार आणि लोकसंख्या वाढ लक्षात घेऊन शासनाने शिलार धरण प्रकल्पाची आखणी केली आहे, मात्र सुमारे ३६७२ कोटी रुपयांचा हा प्रकल्प पूर्ण व्हायला किमान १० वर्षांचा कालावधी लागेल, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, तातडीच्या उपाययोजनेत महापालिकेने दोन स्वतंत्र प्रकल्पांचे नियोजन केले आहे.

पहिल्या प्रकल्पात देहरंग धरणातून पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी वाचवून सिडकोच्या वसाहतींसह नागरिकांना पुरवठा करण्यासाठी १४९ कोटी रुपयांचा जलवाहिनी प्रकल्प सादर करण्यात आला आहे. तर दुसऱ्या प्रकल्पात पनवेल, कामोठे, कळंबोली आणि खारघर येथील सांडपाणी प्रक्रिया केंद्रांतून तृतीयक शुद्धीकरणानंतर मिळणाऱ्या पाण्याचा पुनर्वापर केला जाणार आहे. हे पाणी स्वच्छतागृह, बागा, रस्ते

## दीर्घकालीन उपाययोजना

स्वच्छता तसेच औद्योगिक वापरासाठी वापरले जाईल. या प्रकल्पाचा खर्च सुमारे ३५० कोटी रुपये अपेक्षित आहे. पनवेलमधील सध्याच्या आणि भविष्यातील पाणीटंचाईचा विचार करून महापालिकेने पाणीपुरवठा सुधारण्यावर लक्ष केंद्रीत केले आहे. कामोठे आणि पनवेल येथील मलनिस्सारण केंद्रात तृतीयक शुद्धीकरण प्रकल्प राबवल्यास २० एमएलडी पुनर्वापरयोग्य पाणी उपलब्ध होईल, ज्याचा वापर स्वच्छतागृह, सर्व्हिस स्टेशन आणि बागांमध्ये करता येईल. हा प्रकल्प हस्तांतरीत झालेल्या व भविष्यात हस्तांतरीत होणाऱ्या सर्व मलनिस्सारण केंद्रांत कार्यान्वित झाल्यास १७० एमएलडी पाणी उपलब्ध होईल, जे मोठ्या गृहनिर्माण संस्था, औद्योगिक क्षेत्रातही वापरता येईल. हा प्रस्ताव 'मित्रा' संस्थेमार्फत शासनाकडे पाठवण्यात येणार असून पुढील निर्णय शासनस्तरावर घेतला जाईल, असे पनवेल मनपा आयुक्त मंगेश चितळे यांनी सांगितले.

### जबाबदारी आणि देखभालीबाबत समस्या

कळंबोली आणि खारघर येथील मलनिस्सारण वाहिन्या पनवेल महापालिकेकडे हस्तांतरित झाल्या असल्या तरी संबंधित केंद्रांचे हस्तांतरण सिडकोने अद्याप केलेले नाही. त्यामुळे देखभाल जबाबदारी दोन वेगवेगळ्या यंत्रणांकडे असल्याने समस्या निर्माण होत आहेत.

# मोहोपाडा उतारावरील रस्त्याचे डांबरीकरण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

दांड-रसायनी रस्त्यावरील मोहोपाडा प्रवेशद्वाराजवळील रस्त्याचा उतारावर खडी बाहेर आल्याने रस्त्याची दुरवस्था झाली होती. यामुळे वाहनचालक व प्रवाशांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत होते तसेच मोहोपाडा मुख्य बाजारपेठेच्या उतारावरही मोठमोठे दगड खडे बाहेर आल्याने अपघातांना आमंत्रण मिळत होते.

रसायनी पाताळगंगा परिसराची मुख्य बाजारपेठ असणाऱ्या मोहोपाडा शहर रस्त्याच्या दुरावस्थेमुळे चर्चेत होता. मोहोपाड्याहून दांडफाटा मार्गाकडे जाणारे चढ-उतार रस्त्यांची ही दुरवस्था झाल्याने गंभीर समस्या निर्माण झाली होती. ही समस्या पत्रकार संघानेही मांडली होती.

यावर सार्वजनिक बांधकाम विभागाने मोहोपाडा ते रिस रस्त्यातील बाहेर आलेले टोकदार दगडांवरून डांबरीकरण केले. या रस्त्यावरुन प्रवास करणाऱ्या रसायनी व आसपासच्या परिसरातील प्रवासी व नागरिकांनी याबद्दल कौतुक केले.



# 'इस्त्रो'चा शास्त्रज्ञ असल्याचे सांगून महिलेची फसवणूक

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील रबाळे पोलीस ठाण्या अंतर्गत ऐरोली परिसरात राहणाऱ्या एका महिलेला चक्क इस्त्रोचे शास्त्रज्ञ असून तिला लग्नासाठी भुरळ घालत तब्बल १४ लाख ७० हजार रुपयांना फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार घडला आहे. नवी मुंबई पोलिसांच्या सायबर सेलकडे तक्रार दाखल झाल्यानंतर सायबर सेल व रबाळे पोलिसांनी शिताफीने या प्रकरणाचा छडा लावत फसवणूक झालेल्या महिलेला पुर्ण पैशांचा परतावा करण्यात यश मिळविले आहे.

तक्रारदार महिलेला शादी डॉट कॉम या वेबसाईटवर इस्त्रोचे शास्त्रज्ञ असल्याचा दावा करून लग्नाचे अमिष तरुणाने दाखविले. महिलेशी ओळख झाल्यानंतर इसमाने भुरळ घालत सुमारे २० लाख रुपये उकळले. रबाळे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत, पोलीस निरीक्षक (प्रशासन) श्याम बनसोडे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) सचिन गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली रबाळे पोलीस स्टेशन येथील सायबर सेलच्या महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक अलका पाटील, पोलीस उपनिरीक्षक समीर बगाडे, महिला पोलीस शिपाई प्रिया दुबे, पोलीस शिपाई विकास राळे, पोलीस शिपाई सुनील फटांगरे यांनी त्वरित दखल घेऊन गुन्हा दाखल केला. त्यानंतर फसवणूक झालेल्या महिलेने केलेल्या पैशाच्या व्यवहाराचा तपशील जाणून घेत. बँकांशी व न्यायालयाशी पत्रव्यवहार करून तक्रारदार महिलेचे १४ लाख ७० हजार रूपये परत मिळवून देण्याची उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

# शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली पनवेल आयुक्तांची भेट



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिवसेना शिंदे गट युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांची भेट घेतली. यावेळी विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. या वेळी कामगार नेते, शिवसेना पनवेल तालुकाप्रमुख भरत ज्ञानदेव जाधव उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील काही दिव्यांग बांधवांचे पैसे अकाउंट वर जमा झालेले नाहीत तसेच पालिका क्षेत्रातील झोपडपट्टीचा सर्वे करून कर आकारणी करावी अशी मागणी करण्यात आली. शासनाच्या जीआर प्रमाणे चार टक्के दिव्यांग कोट्यातील कॉन्ट्रॅक्ट पद्धतीमध्ये उच्चशिक्षित दिव्यांगांना नोकरी मिळावी. झोपडपट्टीत राहणारे रहिवासी यांची मुले उच्चशिक्षित आहेत. त्यांना पालिकेमध्ये नोकरी द्यावी. अशा अनेक महत्त्वाच्या विषयांवर या वेळी चर्चा करण्यात आली.

या वेळी शिवसेना युवासेनेचे रोहन रविंद्र ढोले जिल्हा सचिव, रोशन कृष्णा पुजारी, जिल्हा अध्यक्ष, हेमंत शशिकांत शेडगे, उपाध्यक्ष पनवेल विधानसभा उपस्थित होते.

# वाशी डेपो उद्‌घाटनाच्या प्रतीक्षेत

## दिवाळी उलटली तरी बंदच, प्रवाशांची तीव्र नाराजी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

दिवाळीचा सण उलटूनही वाशीतील नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन मंडळाचा अत्याधुनिक बस डेपो अद्याप सुरू न झाल्याने प्रवाशांमध्ये नाराजी वाढली आहे. मागील दीड वर्षापासून पूर्णतः तयार असलेले हे संकुल अद्याप वापरात आलेले नाही. यामुळे प्रवाशांना उघड्यावर ताटकळत बसची वाट पाहावी लागत असल्याने प्रवाशांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.



परिवहन विभागाकडून जून २०२३ पर्यंत डेपो सुरू करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, ऑक्टोबर २०२५ महिना संपत आला तरी अद्याप प्रशासनाकडून याबाबत कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. त्यामुळे अत्याधुनिक सुविधा असलेला हा डेपो आणि त्यातील वाणिज्य संकुल हे अद्याप धूळ खात पडल्याचे चित्र आहे.

वाशी हे नवी मुंबईचे मध्यवर्ती ठिकाण असून, येथून दररोज हजारो प्रवासी कोपरखैरणे, ऐरोली, बेलापूर, ठाणे आणि मुंबईकडे प्रवास करतात. मात्र, नव्याने उभारण्यात आलेला बस डेपो अद्याप बंद असल्याने सध्या प्रवाशांना अस्थायी थांब्यांवरून बस पकडावी लागत आहे. यंदा पावसाळा लांबल्याने ही समस्या अधिकच तीव्र झाली आहे. याबाबत महापालिकेचे परिवहन व्यवस्थापक योगेश कुडुसकर यांना संपर्क साधला असता त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही. त्यांच्याशी संपर्क होऊ न शकल्याने त्यांची अधिकृत प्रतिक्रिया मिळू शकली नाही. त्यामुळे वाशी डेपो प्रवाशांच्या सेवेसाठी कधी सुरू होणार? याबाबत अद्याप तरी संभ्रम कायम आहे.

महापालिकेच्या वतीने वाशी सेक्टर ९मध्ये उभारण्यात आलेल्या या आधुनिक बस डेपो आणि वाणिज्य संकुलासाठी सुरुवातीला १५९ कोटी ८० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. प्रत्यक्ष इमारत उभारणीचा खर्च १४० कोटी रुपयांपर्यंत अपेक्षित होता; मात्र कामात झालेल्या विलंबामुळे एकूण खर्च १९० कोटी रुपयांपर्यंत पोहोचला. तत्कालीन आयुक्त डॉ. रामास्वामी यांच्या काळात या प्रकल्पाचा शुभारंभ झाला होता. २२ मजली वाणिज्य संकुल आणि अत्याधुनिक बस टर्मिनस आता पूर्णतः तयार असून आतील कामेसुद्धा पूर्ण झाली आहेत. येथे असलेल्या व्यावसायिक जागा भाड्याने देऊन दरवर्षी सुमारे ३३ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे. तरीदेखील बस डेपोचे उद्घाटन न झाल्याने संपूर्ण सुविधा ठप्प आहेत. त्यामुळे डेपोत उभारलेल्या वाणिज्य संकुलातून मिळणारा महसूलही रखडला असून, नागरिकांच्या संयमाचा बांधही आता फुटू लागला आहे.

### खासगी वाहन, रिक्षाचालकांना 'सुगीचे दिवस'

महापालिकेने प्रवाशांच्या सोयीसाठी आधुनिक सुविधांनी सज्ज डेपो उभारला असला, तरी तो प्रत्यक्षात सुरू न झाल्याने हा प्रकल्प 'रखडलेल्या विकासाचा आणखी एक नमुना' ठरत असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून दिली जात आहे. सध्या डेपोच्या शेजारील बसथांब्यावर विद्यार्थी, नोकरदार आणि ज्येष्ठ नागरिक तासनतास उभे राहतात. त्यामुळे खासगी वाहन आणि रिक्षाचालकांचे 'सुगीचे दिवस' सुरू झाले असून, त्याचा थेट फटका सामान्य प्रवाशांच्या खिशावर बसत आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने या प्रश्नाची दखल घेऊन वाशीतला हा बस डेपो त्वरित सुरू करावा, अशी मागणी प्रवाशांकडून जोर धरू लागली आहे.

## शासनमान्य प्रशिक्षण, नोकरी

**पनवेल :** रोजगार-स्वयंरोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत विविध प्रशिक्षण कार्यक्रमांचे मोफत आयोजन केले आहे: ऑटो सर्व्हिस टेक्निशियन (फोर व्हीलर), स्टोअर ऑपरेशन्स, इम्पोर्ट एक्स्पोर्ट ह्या प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी नोंदणी सुरू आहे. प्रशिक्षण यशस्वी रित्या पूर्ण केल्यानंतर, उमेदवारांना रोजगार स्वयं रोजगारासाठी साहाय्य केले जाईल. नाव नोंदणीसाठी यशवंत मेमोरियल ट्रस्ट, वायएमटी स्किल्स, पनवेल ९८१९२४८७७१, ९८१९५४०४४८ येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नवी मुंबईतील कॅन्सर रजिस्ट्रीची तज्ज्ञांकडून पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ येथील माँसाहेब मिनाताई ठाकरे रूग्णालयामध्ये कर्करोग नोंदणी विभाग कार्यरत असून याठिकाणी क्ट्रेक अर्थात खारघर येखील प्राध्यापक आणि ऑफिसर इनचार्ज डॉ.अतुल बुडुख यांचेसमवेत आंतरराष्ट्रीय स्तरावरील डॉ. मॅग्डालेना पॅच्कोन्स्की, डॉ अर्पिता पाल यांनी भेट देऊन पाहणीअंती या उपक्रमाची प्रशंसा केली. या पथकाने नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, पावणे येथेही भेट देऊन पाहणी केली.



या भेटीदरम्यान नवी मुंबई महानगरपालिकेच्या सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. धनवंती घाडगे, पॅथोलॉजिस्ट डॉ. संगीता बनसोडे यांनी कॅन्सर रजिस्ट्रीबाबत माहिती देताना महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार कर्करोग नोंदणी विभाग ११ ऑक्टोबर २०२४ पासून महानगरपालिकेच्या माँसाहेब मिनाताई ठाकरे रूग्णालय, नेरूळ येथे वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ.प्रशांत जवादे यांच्या नियंत्रणाखाली सुरू असल्याचे सांगितले.

या विभागांतर्गत नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रहिवाशी असणाऱ्या कर्करोग रूग्णांची नोंदणी करण्यात येते. या माध्यमातून नमुंमपा कार्यक्षेत्रातील कॅन्सरग्रस्त रूग्णांची संख्या, कॅन्सरमुळे होणारे मृत्यू व कोणत्या प्रकारच्या कॅन्सरचा अधिक प्रमाणात प्रादुर्भाव आहे. याबाबत माहिती गोळा करण्यात येत आहे. भविष्यात या माहितीचा उपयोग कर्करोगविषयक पायाभूत सुविधा आणि आरोग्य सुविधा विकसित करण्याकरिता होणार आहे.

डॉ. मॅग्डालेना पॅच्कोन्स्की व डॉ. अतुल बुडुख यांनी सर्व महानगरपालिकांमध्ये कॅन्सर रजिस्ट्री सुरू करणारी नवी मुंबई ही पहिली महानगरपालिका असून २० लाखापेक्षा कमी लोकसंख्येच्या शासन, महानगरपालिका संस्थामध्येदेखील ही पहिलीच महानगरपालिका असल्याचे सांगत प्रशंसा केली व हा उपक्रम नवी मुंबई महानगरपालिकेने सुरू केल्याबद्दल अभिनंदन केले.

# नवी मुंबईत लवकरच इलेक्ट्रिक वाहनांसाठी सुविधा

## पहिल्या टप्प्यात होणार आठ चार्जिंग स्टेशन कार्यान्वित

**नवी मुंबई : बातमीदार**

प्रदूषण नियंत्रणावर भर देत पर्यावरणशील शहर म्हणून नवी मुंबई अग्रभागी असावे यादृष्टीने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विविध पर्यावरणपूरक बाबींवर विशेष लक्ष दिले जात आहे.

इलेक्ट्रीक वाहनांच्या वापराला चालना देऊन हवेचे प्रदूषण रोखणे, ध्वनी प्रदूषण कमी करणे, ऊर्जा बचत व ग्रीन हाऊस गॅसचा प्रभाव कमी करुन पर्यावरण संतुलनाकरिता इलेक्ट्रिक वाहने २०३० पर्यंत किमान ३०% असावीत या केंद्र शासनाच्या धोरणान्वये उद्दिष्टपूर्तीकडे लक्ष दिले जात आहे.

याविषयी राज्य शासनानेही फेब्रुवारी २०२२ मध्ये या धोरणाचा अवलंब केला आहे. निती आयोग यांनी देखील सन २०३० पर्यंत ८०% दुचाकी - तीन चाकी वाहने, ५०% चारचाकी वाहने व ४०% बसेस या इलेक्ट्रिक असण्याची संकल्पना मांडलेली आहे. त्यास अनुसरून या इलेक्ट्रिक वाहनांकरिता पुरेशा प्रमाणात चार्जींग स्टेशन्स उपलब्ध करून देण्याकडे आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष लक्ष दिले जात आहे.




इलेक्ट्रिक वाहनांकरिता चार्जिंग स्टेशन उभारण्यासाठी किमान ७० चौ.मी. इतकी जागा आवश्यक असून त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात रस्त्यालगतच्या उपयुक्त जागा अर्थात ले बे, मॉल्स, विभाग कार्यालये, महानगरपालिका मुख्यालय, मंगल कार्यालये, उद्याने, वाहनतळे अशा गर्दीच्या जागांलगत तसेच महानगरपालिकेच्या अखत्यारितील सार्वजनिक ठिकाणी असलेल्या जागांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. या सर्वेक्षणानुसार शहरामध्ये १ चौ.कि.मी. ग्रीडचा क्लस्टर प्रस्तावित असून त्यामध्ये ६ इलेक्ट्रिक व्हेईकल चार्जींग स्टेशन प्रस्तावित आहेत. सध्या जागेची उपलब्धता लक्षात घेता एका क्लस्टरमध्ये ५ ईव्हीसीएस प्रस्तावित आहेत. अशाप्रकारे एकुण २४ ईव्हीसीएस क्लस्टर म्हणजेच १४३ चार्जिंग पॉईंट्स उभारण्यात येणार आहेत. या माध्यमातून नागरिकांना आपले इलेक्ट्रीक वाहन चार्ज करण्यासाठी उद्याने, मोकळ्या जागा, बस टर्मिनस, मॉल, वाणिज्य संकुले अशा वर्दळीच्या स्थळांजवळच इलेक्ट्रीक वाहन चार्जींग सुविधा उपलब्ध होणार आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सरकारी खाजगी भागीदारी तत्वावर २४ ईव्हीसीएस क्लस्टर म्हणजेच १४३ चार्जिंग पॉईंट्सपैकी सद्यस्थितीत परिमंडळ १ साठी ४ चार्जिंग स्टेशन/ क्लस्टर तसेच परिमंडळ २ साठी ४ चार्जिंग स्टेशन/ क्लस्टर असे एकूण ८ चार्जिंग स्टेशन/ क्लस्टर म्हणजेच ४८ चार्जिंग पॉईंटस उभारण्यात येत आहेत. जागेच्या उपलब्धतेप्रमाणे नियुक्त एजन्सीला ईव्हीसीएस उभारण्याकरिता जागा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.


या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून खासगी एजन्सीज् मार्फत चार्जिंग स्टेशन/ क्लस्टर स्वखर्चाने उभारणी करण्यात येणार आहेत. त्या माध्यमातून नवी मुंबई महानगरपालिकेस चार प्रती किलोव्हॅट इतके उत्पन्न मिळणार आहे. १५ व्या वित्त आयोगांतर्गत मिलीयन प्लस सिटी गटातील शहरांना हवा गुणवत्ता सुधारणा घटकाकरिता प्राप्त निधीमधून यासाठी दोन कोटी इतका खर्च करण्यात येणार आहे.

# दिवाबत्तीच्या खांबांमधील तांब्याची तार चोरणाऱ्यांवर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने महापालिका क्षेत्रात रस्त्यांवर ३५ हजारहून अधिक दिवाबत्तीचे खांब बसविण्यात आले असून त्यामध्ये वाशी लिंक रोड तसेच ठाणे बेलापूर महामार्गावरील दिवाबत्तीच्या खांबामधील तांब्याची तार चोरीला गेल्याचे निदर्शनास आले होते. त्याबाबत वाशी पोलीस ठाण्यात १० दिवसापूर्वी एनसी तक्रारही नोंदविण्यात आली होती. महापालिका विद्युत विभागाच्या वतीने दिवाबत्तीच्या देखभाल व दुरुस्तीसाठी विभागवार एजन्सीजची नेमणूक करण्यात आली असून त्यांच्यामार्फत दिवसातून दोन ते तीन वेळा दिवाबत्तीच्या खांबांची एजन्सीच्या कामगारांकडून पाहणी करण्यात येत असते.

यामध्ये सायन-पनवेल महामार्गावर वाशी टोलनाक्यापुढे वाशी गावाजवळचा भाग तसेच बेलापूर उड्डाणपूलाजवळील भाग तसेच ठाणे बेलापूर मार्गावरील काही भाग येथील दिवाबत्तीच्या खांबांमधील तांब्याची तार चोरीला गेल्याची बाब नमुंमपा विद्युत विभागाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर या भागात अधिक सतर्कता बाळगण्यात आली.



यामध्ये २७ ऑक्टोबर रोजी सायं. ५.३०च्या सुमारास ठाणे बेलापूर रोड वरील कोकीलाबेन हॉस्पिटलजवळ दुभाजकामधील दिवाबत्तीच्या खांबांवरील तांब्याची तार दोन इसम काढत असल्याचे या भागातील दिवाबत्तीची देखभाल व दुरुस्ती करणा-या मे. चैतन्य इलेक्ट्रिकल या एजन्सीच्या कामगारांच्या निदर्शनास आले. या चोरी करणा-या माणसांमधील एक व्यक्ती पळून गेला व एका व्यक्तीस चोरी केलेल्या ४८ मीटर तांब्याच्या तारेसह ताब्यात घेण्यात आले. त्याची रितसर एफआयआर तक्रार मे. चैतन्य इलेक्ट्रिकल यांच्यामार्फत तुर्भे पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेली आहे.

एका दिवाबत्तीच्या खांबामध्ये साधारणत: ४८ मीटर लांब तांब्याची तार वापरली जाते. अशाप्रकारच्या ६० दिवाबत्ती खांबांमधील साधारणत: २८८० मीटर लांबीची तार चोरीला गेल्याचे पाहणीअंती निदर्शनास आले आहे. अशा प्रकारच्या चोरीमुळे या भागातील दिवाबत्तीवर परिणाम होत असून पथदिवे सुरु नसल्याच्या तक्रारी वारंवार प्राप्त होत होत्या. विशेषत्वाने बेलापूर उड्डाणपूलाखालील बसस्टॉप तसेच वाशी गावाजवळील बसस्टॉप येथून जास्त प्रमाणात तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्याचप्रमाणे दिवाबत्ती सुरू नसल्याने या भागात काळोख झाल्याने रहदारीला अडचण होऊन अपघाताचा धोका संभवतो तसेच अनुचित प्रकार घडण्याची संभाव्य शक्यताही व्यक्त केली जात होती.

त्या अनुषंगाने या बाबीकडे गांभिर्याने लक्ष देत शहर अभियंता शिरीष आरदवाड व कार्यकारी अभियंता प्रविण गाडे यांच्या नियंत्रणाखाली महापालिका विद्युत अभियंते व देखभाल दुरुस्ती करणाऱ्या एजन्सीचे कर्मचारी यांचेमार्फत अधिक काटेकोरपणे दक्षता घेण्यात आली. यामुळे दिवाबत्तीच्या खांबांमधील तांब्याची तार चोरी करतांना पकडलेल्या व्यक्तीस तुर्भे पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या बाबतचा अधिक तपास पोलीसांमार्फत करण्यात येत आहे.

या घटनेच्या अनुषंगाने नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अशाप्रकारे महानगरपालिकेच्या अधिकृत एजन्सीमधील कामगारांव्यतिरिक्त कुणी अपरिचीत व्यक्ती दिवाबत्तीच्या खांबानजिक काही कृत्य करतांना दिसल्यास कृपया १८००२२२३०९ / १८००२२२३१० या टोल फ्री क्रमांकावर माहिती देऊन सहकार्य करावे.

# नागोठण्यात भटक्या कुत्र्यांची दहशत

## नागरिकांमध्ये भीती ▌ प्रशासनाने उपाययोजना करण्याची मागणी

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे शहरात सर्वत्र मोकाट फिरणाऱ्या भटक्या कुत्र्यांची नागरिकांमध्ये मोठी दहशत निर्माण झाली असून टोळी टोळीने फिरणाऱ्या व रहदारीच्या रस्त्यावरच ठाण मांडून बसणाऱ्या या भटक्या कुत्र्यांच्या गँगमुळे नागरिकांना विशेषतः लहान मुले व महिलांना घराबाहेर पडणेही मुश्कील झाले आहे. त्यामुळे या मोकाट भटक्या कुत्र्यांचा ग्रामपंचायतीने ठोस उपाययोजनेद्वारे बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.



दरम्यान, यापूर्वी भटक्या कुत्र्यांनी अनेक नागरिकांना चावा घेऊन जखमी केल्याच्या घटना घडल्या आहेत. पून्हा धोखादायक परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी ग्रामपंचायत प्रशासन काय भूमिका घेणार असा सवाल निर्माण झाला आहे.

नागोठणे शहरासह परिसरात या मोकाट, भटक्या व पिसाळलेल्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या कुत्र्यांकडून नागोठणे शहरात लहान मुले, नागरिक यांच्यावर हल्ला चढवुन त्यांना जखमी करण्याचे प्रकारही यापूर्वी अनेकवेळा घडले आहेत. नागोठणे शहरातील मुख्य रहदारीचे रस्ते, बाजारपेठ, मटण व मासळी बाजार तसेच अनेक मोक्याच्या ठिकाणी ही भटकी कुत्री मोठ-मोठ्या गटाने एकत्रितपणे उभी राहत असल्याने शाळेत जाणारी मुले, बाजारात कामानिमित्त येणारे नागरिक, महिला सकाळी मोकळ्या हवेत फिरण्यास बाहेर पडणारे वयोवृध्द नागरिक या सर्वांना या भटक्या कुत्र्यांच्या भीतीचे व दहशतीचे एक प्रकारचे मोठे दडपण घेऊनच मार्निंग वॉक करावा लागत आहे.

नागोठण्यात या भटक्या कुत्र्यांनी मोठ्या प्रमाणात दहशत निर्माण केलेली असतानाच त्यांच्या निर्बिजीकरणा संदर्भात कोणताही ठोस निर्णय स्थानिक ग्रामपंचायत प्रशासन घेत नसल्याने या भटक्या कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यामुळे आता ग्रामपंचायत यावर कोणती ठोस उपाय योजना करते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**ग्रामपंचायतीकडे निधी उपलब्ध नसल्याने तसेच भटक्या कुत्र्यांच्या निर्बिजीकरणा संदर्भात ग्रामपंचायतीकडे कोणतीही यंत्रणा उपलब्ध नसल्याने या संदर्भात कार्यवाहीसाठी ग्रामपंचायतीकडून रोहा पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे काही महिन्यांपूर्वी पत्रव्यवहार करण्यात आला आहे तसेच येथील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी या संदर्भात काही उपाययोजना राबविल्यास ग्रामपंचायत त्यास सहकार्य करण्यास तयार आहे.**
**-सुप्रिया महाडिक**
सरपंच, नागोठणे

**आम्ही भटक्या कुत्र्यांच्या निर्बिजीकरण करण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली डॉक्टरांची टीम तयार करू. कुत्र्यांच्या निर्बिजीकरणासाठी आम्ही लिहून दिलेले औषधे, साहित्य, ऑपरेशन करण्यासाठी दोन हॉल, कुत्रे पकडून आणण्यासाठी मनुष्यबळ ग्रामपंचायतीने आम्हाला उपलब्ध करून द्यावे तसेच ऑपरेशन झाल्यानंतर आमच्या मार्गदर्शनाखाली कुत्र्यांची १५ दिवस ग्रामपंचायतीने काळजी घेण्याची जबाबदारी घेतली पाहिजे.**
**-डॉ. प्रतिक पवाळकर,**
पशुवैद्यकीय अधिकारी, नागोठणे

**मी भटक्या कुत्र्यांच्या निर्बिजीकरणा संदर्भात नागोठणे ग्रामपंचायत अधिकारी व पशुवैद्यकीय अधिकारी यांच्याशी चर्चा केली असून याबाबत ग्रामपंचायत अधिकारी वा पशुवैद्यकीय अधिकारी लवकरच उपाय योजना करतील.**
**-शुभदा पाटील,** गटविकास अधिकारी, रोहा पंचायत समिती

# नुकसान झालेल्या भातपिकांचे सरसकट पंचनामे करण्याची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांचे अवकाळी आणि परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतीतील भात पिकांचे सरसकट १०० टक्के नुकसान झाले आहे. भातशेती वर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे,त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांच्या नुकसानीचे १०० टक्के नुकसान झाल्याबद्दल पंचनामे करावेत अशी मागणी करणारे निवेदन शिवशाही युवा प्रतिष्ठान कडून तहसीलदार यांना देण्यात आले. शिवशाही युवा प्रतिष्ठान कडून अध्यक्ष सागर शेळके आणि तालुक्यातील शेतकरी त्यावेळी उपस्थित होते.



वातावरणातील झालेल्या बदलामुळे पडलेल्या अवकाळी व परतीच्या अतिवृष्टीमुळे कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत दयनीय झाली आहे. मागील सहा महिन्यांपासून सलग आणि अनियमित पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतीवर गंभीर परिणाम झाला आहे. अवकाळी आणि परतीच्या पावसामुळे लागवडीपासून ते पिकाच्या कापणीपर्यंत शेतकऱ्यांना मोठा आर्थिक व शारीरिक तोटा सहन करावा लागला आहे. गत काही दिवसांतील सततच्या मुसळधार पावसामुळे तयार झालेला भात पिक शेतकऱ्यांनी कापून ठेवलेला असताना आत्ता पूर्णपणे नष्ट झाला असून, १००% नुकसान झाल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर दिवाळी सण साजरी आकारण्याची स्थिती राहिली नव्हती.त्यामुळे कर्जत तालुक्यातील शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे.

नेहमीच कर्जत तालुक्यातील शेतकरी बांधवांच्या समस्या शासनाच्या दरबारी मांडणारे शिवशाही युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सागर शशिकांत शेळके शेतकऱ्यांचे वतीने शासनाला पात्र देऊन नुकसानी भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे. आपल्या निवेदनात कर्जत तालुक्यातील सर्व प्रभावित शेतकऱ्यांचे १००% नुकसान तातडीने पंचनामे करून नोंदविण्यात यावे, शासनामार्फत तातडीने शेतकऱ्यांना आर्थिक मदत मंजूर करण्यात यावी. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना बियाणे, खत व शेतीसाठी आवश्यक सवलतींचा लाभ देण्यात यावा अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

# श्रीवर्धन जीवना श्रीराम मंदिरात पेव्हर ब्लॉक कामाचे भूमिपूजन



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचे प्रतीक असलेल्या अखंड जीवना कोळी समाज श्रीराम मंदिर परिसरातील फेवर ब्लॉक कामाचे भूमिपूजन हा सोहळा मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते झाला.

या वेळी मंदिर परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. फडफडणाऱ्या भगव्या पताका, सजलेले रस्ते आणि पारंपरिक वेशभूषेतील महिला व युवकवर्ग यांच्या उपस्थितीने संपूर्ण परिसर दैवी भावनेने न्हाऊन निघाला.

मंत्री अदिती तटकरे यांनी भूमिपूजन करून कोळी समाजाच्या एकतेचे आणि विकासाचे कौतुक केले. त्यांनी श्रीवर्धन तालुक्यातील सामाजिक ऐक्य व ग्रामविकासासाठी नेहमीच पुढाकार घेण्याचे आश्वासन दिले. या वेळी अखंड जीवना कोळी समाज श्रीराम मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजिनदार व पदाधिकारी, तिन्ही पार्टीचे अध्यक्ष उपाध्यक्ष खजिनदार सचिव तसेच विविध पक्षांचे नेते, स्थानिक ग्रामस्थ आणि महिला मंडळी उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान मंत्री अदिती तटकरे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. उपस्थित मावळ्यांनी घोषणाबाजी आणि टाळ्यांच्या गजरात उत्साह व्यक्त केला. भविष्यातील विकासकामांना या भूमिपूजनातून नवी दिशा मिळेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.

# पोकलनमधील डिझेल चोरीप्रकरणी गुन्हा दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

पोकलन चालक परप्रांतियांनी हातसफाई दाखवित केलेली चोरी उघडकीस आल्याने डिझेल चोरी प्रकरणी रेवदंडा पोलिस ठाणे येथे पोकलन चालकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




रेवदंडा बायपास रोडवर चिल्डकॉन कंपनीच्या साइडवरील पोकलन क्रमांक ई एक्स २१०/१४९४ वरील चालक बिहार राज्यातील भोजपूर जादीद, नया भोजपुर बक्सर येथील परप्रांतीय सध्या राहणार चणेरा रोहा तालुका मधील २१ वर्षीय दीपक कुमार भोला चौधरी यांनी २८ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ६ वाजण्याचे सुमारास रेवदंडा बायपास येथील चिल्डकॉन कंपनीच्या साईडवर चिल्डकॉन कंपनी अधिकारी शैलश दादासो तोरणे राहणार रेवदंडा यांचे संमतीशिवाय स्वतः च्या फायदयासाठी पोकलेनच्या डिझेल टॅन्क मधून पाईपच्या सहाय्याने १०० लिटर अंदाजे ९१०० रूपये किमंतीचे प्रति लिटर ९१ रूपयांचे डिझेल चोरी केले अशी तक्रार रेवदंडा पोलिस ठाणे येथे चल्डकॉन कंपनी अधिकारी शैलश दादासो तोरणे यांनी केली.

याबाबतची तक्रारी नुसार भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे, याबाबतची तक्रार रेवदंडा पोलीस ठाण्याचे नाईक सुग्रीव गव्हाणे यांनी दाखल केली असून रेवदंडा पोलीस ठाणे इन्चार्ज श्रीकांत किरविले यांचे मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

# महादेववाडीतील मुलांनी सर केला रायगड किल्ला

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील वाशी ग्रामपंचायत हद्दीतील शिव समर्थ महादेववाडी येथील पाच ते बारा वयोगटातील चिमुकल्या मुलांनी दिवाळी सुट्टीचा अर्थच बदलून टाकला आहे. खेळायच्या, धमाल करण्याच्या वयात या मुलांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या रायगड किल्ल्याची हुबेहूब प्रतिकृती स्वतःच्या कल्पकतेतून साकारली होती. या उपक्रमाला तालुक्यासह परिसरातून भरभरून प्रतिसाद आणि कौतुक मिळालं.



इतकयावर न थांबता, या मुलांनी आता प्रत्यक्ष रायगड किल्ल्यावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेतले आणि त्यांच्या चरणी नतमस्तक झाले. सर्व चिमुकल्यांनी रायगडाच्या तब्बल १५०० ते २००० हुन अधिक पायऱ्या चालत चढल्या आणि तितक्याच उत्साहाने चालत परत आले.

या प्रवासादरम्यान मुलांनी संपूर्ण गड-किल्ल्याची माहिती घेतली आणि अनेक ऐतिहासिक ठिकाणांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. त्यांनी महा दरवाज्याचे बारकाईने निरीक्षण केले, हत्ती तलाव व बजरंगबली मंदिराचे दर्शन घेतले. त्यानंतर शिरकाई देवी मंदिर, ऐतिहासिक बाजारपेठ, स्मारक, मेणा दरवाजा, महाराजांच्या आठ राण्याचे महाल, महाराजांची समाधी, जगदीश्वर मंदिर, टकमक टोक, राजवाडा, गंगा सागर, लोखंडाची तोफ आणि थंड पाण्याचा झरा, दारु कोठार अशी अनेक ठिकाणे प्रत्यक्ष पाहिली आणि अनुभवली.

इतक्या लहान वयात दाखवलेली ही जिज्ञासा, श्रद्धा आणि देशाभिमान पाहून सर्वच पालक, शिक्षक भारावून गेले.

# बांबूच्या सुपांना मागणी घटली

## पारंपरिक हस्तकलेला आधुनिकतेचे ग्रहण; बुरूड समाजासमोर रोजगाराचा प्रश्न

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

एकेकाळी श्रीवर्धनच्या रस्त्यांवर दिसणाऱ्या टोपल्या, सूप, दुरड्या आणि नैवेद्याच्या द्रोणांच्या दुकानांना आज शांततेने पडदा पडू लागला आहे. धार्मिक आणि दैनंदिन जीवनात महत्त्वाचं स्थान असणाऱ्या या बांबूच्या वस्तू आता आधुनिकतेच्या वेगाने झपाटलेल्या काळात मागे पडताना दिसत आहेत.



धान्य पाखडण्यासाठी लागणारे सूप हे केवळ घरगुती वस्तू नव्हे, तर संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. प्रत्येक सण, पूजा, लग्नकार्य किंवा पारंपरिक विधीमध्ये सुपाचा उपयोग आवर्जून केला जातो. मात्र, आज प्लास्टिकच्या वस्तूंनी या पारंपरिक सूपाला मागे टाकले आहे. त्यामुळे बुरूड समाजातील कारागिरांचा हाताचा व्यवसाय अक्षरशः नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.

पूर्वी श्रीवर्धन व आसपासच्या गावांत बुरूड समाजाची अनेक दुकाने होती. हे कारागीर बांबूचे पातळ पट्टे काढून कुशलतेने सूप, दुरड्या, टोपल्या, द्रोण तयार करत. कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या काही भागातून बांबू श्रीवर्धनला आणला जातो. एका बांबूची किंमत १५० ते २०० रुपयांपर्यंत असते. त्यानंतर त्याचे तासून, भिजवून, कोरून तयार होणारी ही वस्तू केवळ परिश्रमाचे नव्हे तर कलात्मकतेचेही उदाहरण आहे.

ही किंमत ऐकायला लहान वाटते, पण त्यामागचा श्रम मोठा आहे. बांबूपासून वस्तू तयार करण्याचे कौशल्य आज हातच्या बोटावर मोजता येईल इतक्या लोकांकडे उरले आहे. त्यासाठी धैर्य, संयम आणि बारकाई लागते. प्रत्येक वस्तू हाताने विणावी लागते. आधुनिक प्लास्टिक युगात हे कौशल्य टिकवणे अवघड झाले आहे. सध्या तरुण पिढी शिक्षण आणि नोकरीच्या शोधात शहरांकडे वळल्याने हा पारंपरिक वारसा हरवण्याच्या मार्गावर आहे.

बांबूच्या वस्तूंना पर्यावरणपूरक पर्याय म्हणून पुन्हा महत्त्व मिळू शकते, जर शासनाने आणि समाजाने योग्य पाठबळ दिलं तर. पर्यटन विकासासोबत या हातकलेचा 'लोकल ब्रँड' तयार झाला, तर श्रीवर्धनसारख्या भागात हा व्यवसाय पुन्हा फुलू शकतो. केवळ व्यवसाय नव्हे, तर परंपरेचं पुनरुज्जीवन म्हणून याकडे पाहायला हवं.

बांबूचे सूप, टोपली, दुरडी या केवळ वस्तू नाहीत, तर आपल्या संस्कृतीचा श्वास आहेत. त्यातून ग्रामीण जीवनशैलीचा सुगंध येतो. आजच्या यांत्रिक जीवनात या हस्तकलेचा पुनर्जन्म व्हावा, यासाठी समाज, प्रशासन आणि पर्यटक सर्वांनी मिळून पाऊल उचलणे गरजेचे आहे. अन्यथा बांबूच्या सूपाची मंदावलेली झणझण ही फक्त आठवणींच्या कुशीत राहील.

शासनाकडून 'बुरूड विकास योजने'अंतर्गत नवे प्रशिक्षण, बाजारपेठ आणि विक्री केंद्र उभारली गेली, तर अनेक कुटुंबांना पुन्हा नवसंजीवनी मिळू शकते. हा केवळ व्यवसाय नाही – ही एक परंपरा आहे, जी टिकवली गेली तरच कोकणचा संस्कृतीवारसा जिवंत राहील.

**बांबूच्या सुपांमधून कोकणच्या संस्कृतीचा गंध दरवळतो. ही फक्त हातकला नाही, तर परंपरेचा सजीव वारसा आहे. आज प्लास्टिकच्या आक्रमणाने या संस्कृतीचा जीव घुटमळतोय. स्थानिक कारागिरांना प्रोत्साहन आणि बाजारपेठ दिली, तर परिवर्तन शक्य आहे. पर्यटन व पर्यावरणपूरक उपक्रमांशी बांबू हातकलेचं पुनरुज्जीवन होऊ शकतं. बुरूड समाजाचा हातगुण टिकवला, तरच संस्कृती टिकेल. नसता बांबूचा सूप फक्त आठवणींचा प्रतीक उरेल – जिवंत वारसा नव्हे.**
**-नंदीनी साळुंके, श्रीवर्धन**

# कुंडलिका खाडीत मच्छीमारांनी नांगरल्या बोटी

## परतीच्या पावसासह बदलत्या हवामानाचा फटका

**रेवदंडा : प्रतिनिधी**

बदलते हवामान व अवकाळी पाउस यामुळे मच्छीमार व्यवसाय पुर्णतः ठप्प झाला असून कुंडलिका समुद्र खाडीत मच्दीमारांच्या मोठ मोठया बोटी नांगरलेल्या दिसत आहेत.



गेले दोन चार दिवस सातत्याने अवकाळी पाउस पडत असून बदलते हवामान यामुळे समुद्रात खोलवरील मच्छीमारी बंद असल्याचे चित्र आहे, कुंडलिका समुद्र खाडीत साळाव पुलाचे दोन्ही बाजूस मच्छीमारांच्या होडया नांगरलेल्या दिसत आहेत, या पुलाचे दोन्ही बाजूस कुंडलिका समुद्र खाडीत कधी नव्हे एव्हळया मोठया मच्छीमार होंडया नांगरलेल्या दिसून येतात. साळाव पुलावरून निसर्गरम्य समुद्र खाडी परिसरात मच्छीमारांच्या नांगरलेल्या होडया पहाण्यासाठी मुरूडकडे जात असलेले पर्यटक काही वेळ साळाव पुलावर ताटकळत उभा राहून हे दृश्य पहाण्याचा अनुभव घेतात.

कुंडलिका समुद्र खाडीत मोठया संख्येने मच्छीमार होडया नांगरलेल्या दिसत असून, यामध्ये उरण, न्हावा शेवा, आक्षी साखर, आदी बाहेरील मोठया मच्छीमार बोटी असल्याचे येथील स्थानिक कोळी बांधवाने माहिती दिली. अचानक बदलले हवामान व अवकाळी पाउस यामुळे मच्छीमार बोटीने कुंडलिका समुद्र खाडीचा आधार घेवून बोटी नांगरल्या आहेत, एकूणच खोलवर समुद्रातील मच्छीमारी पुर्णतः बंद असल्याचे दिसते, मात्र स्थानिक कोळी बांधव कुंडलिका समुद्र खाडीत छोटया छोटया होडयांनी मच्छीमारी करतानाचे साळाव पुलावरून दिसते.

# चौल शितळादेवी येथे कारची काच फोडली

## अज्ञाताविरोधात तक्रार दाखल

**रेवदंडा :** चौल शितळादेवी येथे भर दिवसा पार्किगला उभी असलेल्या इनोव्हा कारची मागील काच फोडण्यात आली, असून या विरोधात रेवदंडा पोलिस ठाणे येथे तक्रार नोंदविण्यात आली आहे.

चौल शितळादेवी येथे प्रतिक गुरव यांची एम.एच.०१/८८/८३४८ क्रमांकांची इनोव्हा कार पार्किग केली होती, या पार्किग इनोव्हा कारची दि. २९ ऑक्टोबर २०२५ चे दिवशी सकाळी १०.०० ते सायकांली ५.३० चे दरम्यान भर दिवसा कोणीतरी अज्ञात इसमाने दारूची रिकामी बाटली फेकून पाठीमागील काच फोडली व इनोव्हा कारचे नुकसान केले, अशी तक्रार रेवदंडा पोलिस ठाणे येथे प्रतिक गुरव यांनी नोंदविली आहे.

# महिला संघांची वार्षिक सर्वसाधारण सभा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष पंचायत समिती अलिबाग अंतर्गत चंद्रयान ३ महिला प्रभाग संघ चेंढरे यांची वार्षिक सर्वसाधारण सभा वाडगावमध्ये झाली.

या सभेस माजी पंचायत समिती सदस्य जुईली पाटील तसेच शिरीष पाटील (जिल्हा अभियान व्यवस्थापक रायगड अलिबाग) तसेच माधुरी जाधव DMIBCB, तसेच सुजाता पाटील DMFI, ग्रामपंचायत वाडगाव सरपंच सारिका गणेश पवार, वाडगाव ग्रामपंचायत सदस्य, खंडाळे ग्रामपंचायत सदस्य, वेश्वी ग्रामपंचायत सदस्य, रिद्धी आवळे (तालुका अभियान व्यवस्थापक पंचायत समिती अलिबाग), रिया पाटील IBCB (पंचायत समिती अलिबाग), प्रभाग समन्वयक साईनाथ पाटील, गणेश मस्के, सोनम पवार, अमोल माळी व प्रभागसंघ अध्यक्ष, कोषाध्यक्ष ,सचिव तसेच सर्व सीआरपी, बँक सखी तसेच सर्व स्वयंसहायता समूहातील महिला उपस्थित होत्या.

शिरीष पाटील यांनी प्रभाग संघाच्या पुढील नियोजनाबद्दल व प्रत्येक महिलेने व्यवसायात उतरावे याविषयी मार्गदर्शन केले.

# आयपीएलपूर्वी केकेआर संघात मोठा बदल

## अभिषेक नायर मुख्य प्रशिक्षकपदी

**कोलकाता : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६चा हंगाम काही महिन्यांवर असला तरी कोलकाता नाईट रायडर्स संघातून मोठी बातमी समोर आली. केकेआरच्या व्यवस्थापनाने कोचिंग सेटअपमध्ये महत्त्वपूर्ण बदल करत चंद्रकांत पंडित यांच्याऐवजी अभिषेक नायर यांची संघाच्या नवीन मुख्य प्रशिक्षक पदी नियुक्ती केली आहे.

प्रसिद्ध आणि अनुभवी प्रशिक्षक चंद्रकांत पंडित हे मागील तीन वर्षांपासून केकेआर संघासोबत होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली केकेआरने तब्बल दहा वर्षांच्या प्रतीक्षेनंतर २०२४मध्ये आयपीएलचे विजेतेपद जिंकले, मात्र २०२५चा हंगाम केकेआरसाठी अत्यंत निराशाजनक ठरला. अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखालील केकेआरचा संघ पॉइंट टेबलमध्ये आठव्या स्थानावर राहिला. या खराब कामगिरीनंतर संघ व्यवस्थापनाने मोठा निर्णय घेत पंडित यांच्याशी असलेले संबंध संपवले.



अभिषेक नायर यांच्यासाठी केकेआरमध्ये मुख्य प्रशिक्षक म्हणून झालेले पुनरागमन अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी यापूर्वी फ्रँचायझीसाठी सहाय्यक प्रशिक्षक म्हणून काम केले आहे आणि त्यांचे संघातील खेळाडूंशी चांगले संबंध आहेत. नायर यांनी महिला प्रीमियर लीगमध्ये यूपी वॉरियर्सचे मुख्य प्रशिक्षक म्हणूनही काम केले आहे, जिथे त्यांनी अनेक तरुण प्रतिभेला ओळखण्यात आणि त्यांना विकसित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. नायर यांना देशांतर्गत क्रिकेटमध्ये आणि तरुण खेळाडूंसोबत काम करण्याचा मोठा अनुभव आहे. त्यांनी दिनेश कार्तिक, श्रेयस अय्यर आणि हार्दिक पंड्या यांच्यासह अनेक भारतीय खेळाडूंच्या कारकिर्दीवर थेट प्रभाव पाडला आहे.

बीसीसीआय लवकरच म्हणजेच नोव्हेंबर २०२५ मध्ये सर्व फ्रँचायझींना त्यांच्या राखलेल्या खेळाडूंची यादी सादर करण्यास सांगेल. अभिषेक नायर यांच्या नियुक्तीनंतर त्यांची पहिली आणि मोठी जबाबदारी म्हणजे कोणत्या खेळाडूंना संघात कायम ठेवायचे आणि कोणत्या महत्त्वाच्या खेळाडूंना लिलावासाठी मुक्त करायचे हे ठरवणे असेल. नायर यांच्या नेतृत्वाखाली केकेआरचा संघ २०२६च्या हंगामासाठी कोणत्या खेळाडूंवर विश्वास दाखवते? हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

# प्रो कबड्डीची आज अंतिम लढत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**


पुणेरी पलटन आणि दबंग दिल्ली या दोन संघांमध्ये प्रो कबड्डी २०२५च्या सीझनच्या अंतिम फेरीचा सामना शुक्रवारी (दि. ३१) संध्याकाळी ८ वाजता होणार आहे. हा सामना दिल्लीतील त्यागराज स्टेडियममध्ये होईल आणि स्टार स्पोर्ट्स व जिओ हॉटस्टार हा सामना लाईव्ह पाहता येणार आहे.

पुणेरी पलटणने गेल्या चार सीझनमध्ये तिसऱ्यांदा फायनलमध्ये धडक मारण्याचा पराक्रम केला आहे. पुणेरी पलटण आणि दबंग दिल्ली यांच्यातील यंदाच्या सीझनमधील तिन्ही सामने टाय झाले आहेत. यापैकी दोन सामने दिल्लीने तर एक सामना पलटनने जिंकला होता. त्यामुळे अगदी तोडीस तोड टक्कर देणारे संघ फायनलमध्ये खेळणार असल्याने सामना अधिक चुरशीचा होणार आहे.

# उरणच्या प्रतिक दर्णेची आंतरराष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धांसाठी निवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा हौशी शरीरसौष्ठव संघटनेतील उरण येथील राष्ट्रीय शरीरसौष्ठवपटू प्रतिक प्रवीण दर्णे याची थायलंडमधील पटाया येथे होणाऱ्या जागतिक बॉडीबिल्डिंग स्पर्धा मिस्टर आशिया आणि मिस्टर वर्ल्डकरिता भारतीय संघात निवड झाली आहे. स्पर्धा २७ ते २९ नोव्हेंबर या कालावधीत होणार आहेत.



प्रतिक याने यापूर्वी रायगड श्री, द्रोणगिरी श्री, महाराष्ट्र कुमार हे किताब नावावर केले असून आता त्याचे पुढील लक्ष जागतिक पातळीवर उत्कृष्ट कामगिरी करण्याचे आहे. उरण येथील एक छोट्या खेड्यातील हा स्पर्धक तालुका, जिल्हा, देश यानंतर आज जागतिक पातळीवर आपले नाव कोरण्यासाठी सज्ज झाला आहे. रायगड जिल्हा हौशी शरीरसौष्ठव संघटनेबरोबर संतोष साखरे, जितेंद्र गुरव, ट्रेरेन्स फर्नांडिस, नंदकिशोर शिंदे यांनी त्याला मार्गदर्शन केले. प्रतिकच्या आंतरराष्ट्रीय निवडीबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत असून अनेकांनी त्याला शुभेच्छा दिल्या.

# कराटे स्पर्धेत उरणमधील खेळाडूंचे यश



**उरण : बातमीदार**

अलिबाग नेहुली येथे जिल्हास्तरीय शालेय कराटे स्पर्धा नुकतीच झाली. त्यामध्ये उरण तालुक्यातील गोशीन रियु कराटे असोसिएशनच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक कामगिरी केली.

राज्य क्रीडा व युवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा अधिकारी आणि क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच कराटे-डो ऑर्गनायझेशन ऑफ रायगडच्या सहकार्याने आयोजित ही स्पर्धा विविध वजनी गटात खेळली गेली.

यामध्ये १९ वर्षाखालील गटात विघ्नेश विशाल पाटील आणि १७ वर्षाखालील वैदेही योगेश घरत, तंमीर इसाक अली शहा यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. त्यांची निवड विभागीय कराटे स्पर्धेसाठी झाली आहे. याशिवाय १४ वर्षाखालील गटात तनुज गावंड याने द्वितीय, तर सोज्वल याने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

या विद्यार्थ्यांना गोपाळ म्हात्रे, सिहान राजू कोळी, परेश पावसकर, अमिता घरत, राकेश म्हात्रे यांनी मार्गदर्शन केले. स्पर्धेच्या आयोजनात जिल्हा क्रीडा अधिकारी व कराटे ऑर्गनायझेशन रायगडचे सिहान राहुल तावडे यांचे सहकार्य लाभले.



# नेमबाज अवनी कोळीला दोन पदके

**उरण : रामप्रहर वृत्त**

४०वी महाराष्ट्र रायफल शॉटगन शूटिंग चॅम्पियनशिप स्पर्धा पालघर येथे २१ ते २९ ऑक्टोबरदरम्यान झाली. या स्पर्धेत सिद्धांत रायफल शूटिंग क्लब रायगडची अवनी अलंकार कोळी हिने सुवर्ण आणि कांस्य अशी दोन पदके जिंकली.

अवनीने रायगड जिल्ह्याचे नेतृत्व करत ज्युनिअर वूमन डबल ट्रॅप शॉटगन स्पर्धेत सुवर्णपदक आणि ट्रॅप शूटिंगमध्ये ज्युनिअर वूमन ट्रॅपमध्ये कांस्यपदक प्राप्त केले. या पदकांमुळे तिचे अभिनंदन होत आहे.

# द. आफ्रिका संघ प्रथमच फायनलमध्ये; महिला वर्ल्डकप स्पर्धेत इंग्लंडवर एकतर्फी विजय

**गुवाहाटी : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेने इंग्लंडचा १२५ धावांच्या मोठ्या फरकाने पराभव करत महिला विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रथमच स्थान निश्चित केले आहे. पहिल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात कर्णधार लॉरा वोलवार्ड्टच्या शानदार शतकी खेळीच्या जोरावर द. आफ्रिकेने निर्धारित ५० षटकांत सात गड्यांच्या मोबदल्यात ३१९ धावांचा डोंगर उभा केला होता. या आव्हानाचा पाठलाग करताना इंग्लंडचा संघ केवळ ४२.३ षटकांत १९४ धावांतच गारद झाला.

इंग्लंडने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता, पण त्यांचा हा निर्णय पूर्णपणे चुकीचा ठरला. दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वोलवार्ड्ट हिने एका बाजूने किल्ला लढवत १४३ चेंडूंत २० चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने १६९ धावांची मोठी आणि महत्त्वपूर्ण खेळी साकारली.

वोलवाड्र्टने सलामीला तैजमिन



ब्रिट्ससोबत ११६ धावांची शानदार भागीदारी केली. ब्रिट्सने ४५ धावांचे योगदान दिले. पहिली विकेट पडल्यानंतर दक्षिण आफ्रिकेचा डाव काहीसा लडखडताना दिसला. एका वेळी आफ्रिकेने २०२ धावांच्या धावसंख्येवर आपले सहा गडी गमावले होते. अशा संकटजन्य परिस्थितीत कर्णधार वोलवार्ड्टची खेळी संकटमोचकाप्रमाणे संघाला सावरत राहिली. तिच्या या खेळीमुळेच आफ्रिकेने केवळ मोठी धावसंख्या उभारली नाही. वोलवार्ड्ट ४८व्या षटकात बाद झाली.

विशाल लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेला इंग्लंडचा संघ सुरुवातीपासूनच दबावाखाली दिसला. संघाचे पहिले तीन फलंदाज शून्यावर बाद झाले. शून्यावर दोन, तर एका धावसंख्येवर तीन फलंदाज पॅव्हेलियनमध्ये परतले होते. इथून संघाचे पुनरागमन अत्यंत कठीण राहिले. चौथ्या विकेटसाठी नॅट सीव्हर ब्रंट आणि एलिस कॅप्सी यांनी १०७ धावांची महत्त्वाची भागीदारी करत थोड्या आशा पल्लवित केल्या, मात्र, दोघीही अर्धशतक पूर्ण करून बाद झाल्यावर इंग्लंडचा डाव लवकरच संपुष्टात आला. कॅप्सीने ५० धावा केल्या, तर नॅट सीव्हर ब्रंटने ६४ धावा काढून आपली विकेट गमावली.

या विजयात दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनीही मोलाची भूमिका बजावली. मारिजन कॅप हिने भेदक गोलंदाजी करत पाच बळी घेतले, तर नादिन डी क्लार्कने दोन गडी बाद केले. याव्यतिरिक्त आयबोंगा खाका, म्लाबा आणि सुने लूस यांनी प्रत्येकी एक-एक विकेट घेत संघाला ऐतिहासिक विजय मिळवून दिला.

# संघ निवडीबाबत उपस्थित होणाऱ्या प्रश्नांवर शमीचे उत्तर

**कोलकाता : वृत्तसंस्था**

टीम इंडियाचा अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी सध्या रणजी ट्रॉफीमध्ये जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. त्याने आतापर्यंत खेळलेल्या दोन सामन्यांत एकूण १५ विकेट्स घेऊन निवडकर्त्यांना त्याची फिटनेस दाखवून दिली, मात्र या कामगिरीसोबतच मुख्य निवडकर्ता अजित आगरकर आणि शमी यांच्यातील कथित तणावाचे वृत्तही चर्चेत आले. आता बीसीसीआयच्या हस्तक्षेपानंतर हा वाद थंडावल्याचे संकेत मिळत आहेत.

काही आठवड्यांपूर्वी वेस्ट इंडिज मालिकेसाठी निवड न झाल्यानंतर शमीने सांगितले होते की, तो पूर्णपणे तंदुरुस्त आहे,



परंतु त्याला बीसीसीआय किंवा निवडकर्त्यांकडून कोणतीही माहिती मिळाली नाही. तो असेही म्हणाला, अपडेट्स देणे किंवा घेणे हे माझे काम नाही. माझे काम एनसीएमध्ये जाणे, तयारी करणे आणि सामने खेळणे आहे. अपडेट्स कोण देईल किंवा नाही हे त्याचे प्रोफेशन आहे. यावर उत्तर देताना अजित आगरकर यांनी स्पष्ट केले होते की, शमीशी बोलणे झाले आहे, परंतु बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकाला तो आंतरराष्ट्रीय क्रिकेटसाठी पूर्णपणे तयार असल्याचे वाटत नाही.

परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी बीसीसीआयने हस्तक्षेप केला. बोर्डाने आपले नवीन मध्यवर्ती क्षेत्र निवडक आरपी सिंगला या प्रकरणाकडे लक्ष देण्यासाठी पाठवले. कोलकाता येथील ईडन गार्डन्सवर बंगाल विरुद्ध गुजरात रणजी सामन्यादरम्यान आरपी सिंग हा शमीशी बोलताना दिसले.

गुजरातविरुद्धच्या दुसऱ्या सामन्यात शमीने आठ विकेट्स घेतल्या. या धडाकेबाज कामगिरीनंतरही त्याने कोणतेही वादग्रस्त विधान करणे टाळले. संघ निवडीबाबत उपस्थित होणाऱ्या प्रश्नांवर तो मिश्किलपणे म्हणाला की, मी नेहमीच वादात असतो. मीडियाने मला असा गोलंदाज बनवले आहे की, मी बोललो तर वाद होईल. आता मी काय बोलू शकत नाही, सोशल मीडियावर कोणीही काहीही बोलू शकते.

**द. आफ्रिकेविरुद्ध मालिकेत निवड होण्याची शक्यता**

मोहम्मद शमीचा सध्याचा फॉर्म पाहता १४ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या भारत-दक्षिण आफ्रिका कसोटी मालिकेत त्याचा संघात समावेश होण्याची दाट शक्यता आहे. आरपी सिंग यांच्या हस्तक्षेपामुळे आता हा तणाव कमी होऊन खेळाडू आणि निवडकर्ते यांच्यात समन्वय साधला गेला असल्याचे दिसून येत आहे.

# हॉकी वर्ल्डकपमध्ये पाकच्या जागी ओमानचा समावेश

**लोझान : वृत्तसंस्था**

भारतात होणाऱ्या कुमार गटाच्या विश्वचषक हॉकी स्पर्धेतून पाकिस्तानने माघार घेतल्यावर आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाने (एफआयएच) त्यांच्या जागी ओमानचा समावेश केला आहे.

ही स्पर्धा २८ नोव्हेंबर ते १० डिसेंबर या कालावधीत चेन्नई आणि मदुराई येथे रंगणार आहे. गेल्या वर्षीच्या कुमार आशिया चषक स्पर्धेत पाकिस्ताननंतर सर्वोच्च स्थानावर असलेला संघ म्हणून ओमान आता विश्वचषक स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. स्पर्धा त्रयस्थ केंद्रावर खेळवण्याची पाकिस्तानची विनंती फेटाळल्यानंतर 'एफआयएच'ने हा निर्णय घेतला.

# आज भारत वि. ऑस्ट्रेलिया दुसरी टी-२० लढत

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पहिला टी-२० सामना पावसामुळे वाया गेला. आता दुसरा टी-२० सामना ३१ ऑक्टोबर रोजी मेलबर्न क्रिकेट ग्राउंडवर खेळला जाणार आहे.

या सामन्यात भारताचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहकडे मोठा विक्रम ब्रेक करण्याची संधी आहे. त्याने चार विकेट्स घेतल्यास तो झटपट क्रिकेटमध्ये १०० विकेट्सचा टप्पा पूर्ण करेल. आतापर्यंत भारताचा एकमेव वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगला भारतासाठी १०० विकेट्स मिळवता आल्या आहेत. लवकरच या यादीत बुमराहचेही नाव जोडले जाण्याची शक्यता आहे.

जसप्रीत बुमराहने २०१६ साली भारतीय संघासाठी टी-२०मध्ये पदार्पण केले आणि तेव्हापासून तो संघातील एक महत्त्वाचा खेळाडू आहे. त्याने आतापर्यंत ७६ टी-२० सामन्यांमध्ये एकूण ९६ विकेट्स घेतल्या आहेत. २०२४च्या टी-२० विश्वचषकात त्याने दमदार गोलंदाजी केली होती. या स्पर्धेत त्याने एकूण १५ विकेट्स



घेत विरोधी संघांचे कंबरडे मोडले.

**अर्शदीपला संधी मिळण्याची शक्यता**

पहिल्या टी-२० सामन्यात कर्णधार सूर्यकुमार यादवने जसप्रीत बुमराह आणि हर्षित राणा या दोन वेगवान गोलंदाजांना संधी दिली. तथापि, मेलबर्नची खेळपट्टी नेहमीच वेगवान गोलंदाजांना अनुकूल राहिली आहे. अशा परिस्थितीत तो तीन वेगवान गोलंदाजांना मैदानात उतरवू शकतो आणि अर्शदीप सिंगलाही प्लेईंग इलेव्हनमध्ये जागा मिळू शकते. अलिकडच्या काळात, अर्शदीप आणि बुमराहच्या जोडीने अनेक सामन्यांमध्ये भारताला विजय मिळवून दिला आहे.

# किशोर गट राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा ५ नोव्हेंबरपासून पुण्यात

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशच्या मान्यतेने पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या यजमानपदाखाली राकेशभाऊ घुले कबड्डी संघ यांच्या विद्यमाने ३६व्या किशोर-किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. पुण्यातील बोपखेले, खडकी, डीगी गाव, मिलिट्री कॅम्पजवळ ५ ते ९ नोव्हेंबर या कालावधीत ही स्पर्धा होईल.

या स्पर्धेतून महाराष्ट्राचे किशोर व किशोरी गटाचे संघ निवडण्यात येतील. हे दोन्ही संघ हरियाणामध्ये २८ नोव्हेंबरपासून होणाऱ्या ३५व्या किशोर-किशोरी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करतील.

या वर्षापासून भारतीय कबड्डी महासंघाने फक्त मुलांच्या वजनात वाढ केली आहे. मुलांचे वजन ५५ किलोऐवजी ६० किलो करण्यात आले आहे. मुलींचे वजन मात्र ५५ किलोचे ठेवण्यात आले आहे. याची दाखल घेऊन सर्व संलग्न जिल्हा संघटनानी आपल्या खेळाडूंची नोंदणी करून ऑनलाईन प्रवेश अर्ज त्वरित भरावेत, असे आवाहन एका परिपत्रकाद्वारे राज्य कबड्डी संघटनेचे सचिव बाबुराव चांदेरे यांनी प्रसारमाध्यमांद्वारे सर्व संलग्न जिल्हा संघटनाना केले आहे. लवकरच स्पर्धेची गटवारी जाहीर करण्यात येईल.

# श्रेयस अय्यरच्या प्रकृतीत सुधारणा; स्वत: इन्स्टा पोस्ट करत दिली माहिती

**सिडनी : वृत्तसंस्था**

टीम इंडियाचा स्टार फलंदाज श्रेयस अय्यर याला ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यादरम्यान गंभीर दुखापत झाली होती. झेल घेताना पडल्याने त्याच्या बरगड्यांना मार लागला आणि त्याला मैदान सोडावे लागले. सध्या तो रुग्णालयात उपचार घेत असून त्याने स्वतः इन्स्टाग्रामवर आपल्या प्रकृतीबाबतची माहिती दिली आहे.

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यादरम्यान श्रेयस अय्यरच्या पोटावर आघात झाला. त्याच्या प्लीहावर किरकोळ छेद झाला



असून अंतर्गत रक्तस्राव सुरू झाल्याची माहिती भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) दिली होती. अय्यरची प्रकृती आता स्थिर आहे.

इन्स्टाग्रामवर श्रेयस अय्यरने चाहत्यांनी दिलेल्या पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. त्याने इन्स्टा स्टोरीमध्ये लिहिले आहे की, सध्या माझ्यावर उपचार सुरू असून दिवसेंदिवस प्रकृतीमध्ये सुधारणा होत आहे. मला मिळालेल्या सर्व शुभेच्छा आणि पाठिंब्याबद्दल मी खूप कृतज्ञ आहे, हे माझ्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. मला तुमच्या विचारात ठेवल्याबद्दल धन्यवाद!

अय्यरच्या प्रकृतीत सुधारणा होत असली तरी ३० नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी त्याची उपलब्धता अद्याप अनिश्चित आहे. सामना सुरू होण्याच्या अगदी जवळ, वैद्यकीय अहवाल आणि मॅच फिटनेसच्या आधारावर भारतीय संघ व्यवस्थापन अंतिम निर्णय घेण्याची शक्यता आहे. बीसीसीआय आणि संघ व्यवस्थापन श्रेयस अय्यरला मैदानात उतरवण्यासाठी घाई करणार नाही. त्याला पूर्ण रिकव्हरीला प्राधान्य देण्यात येईल अशी अपेक्षा आहे.

# नेटमध्ये सराव करताना युवा क्रिकेटपटूचा मृत्यू

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

नेटमध्ये फलंदाजीचा सराव करत असताना बॉलिंग मशीनमधून आलेला चेंडू डोक्याला लागून एका युवा क्रिकेटपटूचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना ऑस्ट्रेलियातील मेलबर्न येथे घडली आहे. बेन ऑस्टिन (वय १७) असे या क्रिकेटपटूचे नाव असून सरावादरम्यान मशीनमधून आलेला चेंडू लागून तो गंभीर जखमी झाला होता. त्यानंतर उपचारादरम्यान, त्याचा मृत्यू झाला.

बेन ऑस्टिन हा फर्नट्री गल्लीतील वॉली ट्यू रिझर्व्ह येथे सराव करत होता. तेव्हाच ही दुर्घटना घडली. नेट्समध्ये ऑटोमॅटिक बॉलिंग मशीनमधून गोलंदाजीचा सराव करत असताना बेन याने हेल्मेट घातले होते. तरीही डोके आणि गळ्याच्या भागात येऊन चेंडू लागल्याने त्याला जबर



दुखापत झाली. त्यानंतर वैद्यकीय पथक तातडीने तिथे दाखल झाले तसेच बेनला गंभीर अवस्थेत मोनाश मेडिकल सेंटरमध्ये नेण्यात आले. डॉक्टरांनी त्याचे प्राण वाचवण्याचे पूर्ण प्रयत्न केले, मात्र त्याचा मृत्यू झाला.

बेन ऑस्टिनच्या मृत्यूमुळे क्रिकेटविश्वात शोककळा पसरली आहे. बेन ज्या फर्नट्री क्रिकेट क्लबकडून खेळायचा त्या क्लबने एक पत्रक प्रसिद्ध करून बेनच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com